



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक २८१ * नांदेड * गुरूवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





# जरांगेंनी समाजाच्या व्यासपीठाचा राजकीय वापर करू नये; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)**– मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी केलेल्या ५०० कोटींच्या आरोपांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी खंडन केले. मी कोणालाही ५०० कोटी रुपये दिलेले नाहीत किंवा घेतलेले नाहीत. जरांगे-पाटील यांनी आरोप करण्यापूर्वी शहानिशा करावी. त्यांच्याकडे काही पुरावे असतील, तर ते सादर करावेत. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, म्हणजे दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, असे प्रतिआव्हान शिंदे यांनी दिले. मराठा समाजाच्या



प्रश्नांसाठी जरांगे यांनी काम करावे; मात्र समाजाच्या व्यासपीठाचा राजकीय वापर करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यासाठी शिंदे बुधवारी दिल्लीत होते. या वेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी जरांगे यांच्या आरोपांवर भूमिका स्पष्ट केली. आमचे सर्व प्रवक्ते यावर बोलत आहेत. मी कोणालाही ५०० कोटी रुपये दिलेले नाहीत किंवा घेतलेले नाहीत. जरांगे यांनी शहानिशा करून बोलावे. त्यांच्याकडे पुरावे असतील, तर ते द्यावेत. त्याची चौकशी झाली पाहिजे, असे शिंदे म्हणाले.

**जरांगेंच्या ५०० कोटी रूपयांच्या आरोपांना एकनाथ शिंदेंचे प्रत्युत्तर; पुरावे सादर करण्याचे आव्हान**

बीडमधील दसरा मेळाव्यात मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आरोप केला होता. त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत ५०० कोटी रुपये दिल्याची चर्चा भाजपमध्ये असल्याचा दावा केला होता. या आरोपावर शिंदे यांनी दसरा मेळाव्यात उत्तर द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले होते. या टीकेनंतर जरांगे यांनी पत्रकार परिषद घेऊन पुरावे सादर करण्याचा इशारा दिला आहे. यावर एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले असून आपण कोणालाही ५०० कोटी रूपये दिले नसून कोणाचे ५०० कोटी रूपये घेतलेलेही नाहीत, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. त्याचबरोबर मनोज जरांगे यांनी पुरावे सादर करावेत, असे आव्हानही एकनाथ शिंदे यांनी जरांगे यांना दिले आहे.

# नऊ दिवसांच्या भक्तीनंतर दुर्गादेवीला निरोप; ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन, पोलिसांचा चोख बंदोबस्त




**नांदेड (प्रतिनिधी)**– मागील नऊ दिवस मनोभावे पूजा- अर्चा केल्यानंतर बुधवार दि. २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी शहरासह तालुक्यातील गावोगावी भक्तिमय वातावरणात दुर्गादेवीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. 'दुर्गामाता की जय', 'बोलो अंबे मात की जय' च्या जयघोषात संपूर्ण नांदेड नगरी दुमदुमून गेली होती. रात्री उशिरापर्यंत अर्धापूर तालुक्यातील येळेगाव आणि पिवळा तलावात दुर्गा मातेचे विसर्जन करण्यात आले. यावेळी पोलीस, महसूल आणि महापालिका प्रशासनाने चोख बंदोबस्त व तयारी ठेवली होती.

शहरातील पावडेवाडी नाका छत्रपती शाहू महाराज पुतळा परिसर, सांगवी, तरोडा खु., श्रीनगर, शिवाजीनगर, तरोडा बुद्रुक, बसस्थानक परिसर, गांधी नगर, तारासिंग मार्केट, जुना मोंढा, गाडीपुरा, सराफा मारवाड गल्ली, चौफाळा, चैतन्यनगर साईबाबा मंदिर, हनुमान गड यासोबतच जुना कौठा, नविन कौठा, सिडको- हडको आदी भागातील सार्वजनिक दुर्गा मंडळांच्या मूर्तींची विसर्जन मिरवणूका दुपारी ३ वाजता सुरू झाल्या. प्रत्येक मंडळाने आकर्षक विद्युत रोषणाई, ढोल- ताशा पथक, लेझीम पथकासह मिरवणुकीत सहभाग घेतला होता.

**महिला व युवतींचा मोठा सहभाग**

विसर्जन मिरवणुकीत महिला व युवतींनी पारंपरिक वेशभूषेत फुगड्या, गरबा खेळत सहभाग घेतला होता. नऊ दिवस उपवास करून देवीची सेवा केलेल्या भाविकांनी बुधवारी देवीला जड अंतःकरणाने निरोप दिला. पुढच्या वर्षी लवकर या, अशी प्रार्थनाही अनेकांनी केली.

**प्रशासनाची चोख व्यवस्था**

विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, प्रशांत शिंदे आणि शहरातील सर्व ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तसेच महापालिका आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त सरदार अजितपालसिंग संधू यांच्या नेतृत्वाखाली विसर्जन घाटावर क्रेनची व्यवस्था तसेच जीव रक्षकांची तैनाती करण्यात आली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून विसर्जन स्थळी बॅरिकेटिंग, लाईट व्यवस्था आणि आपत्कालीन पथक तैनात करण्यात आले होते. डीजेवर बंदी असल्याने मंडळांनी पारंपरिक ढोल-ताशाचाच वापर केला.

# दुष्काळामुळे मराठवाड्यात ३५ हजार कोटींचे नुकसान; हेक्टरी १ लाखाची मदत द्या -आ. रोहित पवार



**नांदेड (प्रतिनिधी)**–मराठवाड्यात यंदा सरासरीपेक्षा ५५ टक्के कमी पाऊस झाला असून, यामुळे शेतकऱ्यांचे सुमारे ३५ हजार कोटी रुपयांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा गंभीर परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांची चेष्टा न करता त्यांना प्रतिहेक्टरी १ लाख रुपयांची ठोस आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी नांदेड येथे पत्रकार परिषदेत केली.

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांशी संवाद साधण्यासाठी आमदार रोहित पवार नांदेड दौऱ्यावर आले होते. या वेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते, तेव्हाही सरकारने योग्य मदत दिली नाही. अशा कठीण प्रसंगी सरकारने ५ हजार रुपयांची अत्यंत तोकडी मदत जाहीर करून शेतकरी आणि गरिबांची एकप्रकारे थट्टाच केली आहे.

महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन करत आमदार पवार म्हणाले, आमदार सतीश चव्हाण यांनी पदवीधरांचा विश्वास गमावला असून, या निवडणुकीत त्यांचा मोठ्या फरकाने पराभव होईल. या पत्रकार परिषदेला खासदार रवींद्र चव्हाण, माजी राज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर, प्रा. यशपाल भिंगे, भगवानराव आलेगावकर, डॉ. विठ्ठल पावडे, महेश देशमुख तरोडेकर, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, आनंद पाटील, रऊफ इनामदार, तातेराव पाटील आलेगावकर, धनंजय सूर्यवंशी, सत्यपाल सावंत, सुभाष रावनगावकर आणि प्रांजली रावनगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**५ हजारांची मदत देऊन शेतकऱ्यांची थट्टा**

मराठवाड्यात ५५ टक्के कमी पाऊस झाला असून यामुळे शेतकऱ्यांचे सुमारे ३५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ५ हजार रूपयांची मदत देऊन शेतकऱ्यांची सरकारने थट्टा केली आहे. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांची चेष्टा न करता हेक्टरी १ लाख रुपयांची ठोस आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आ. रोहित पवार यांनी केली.

# सीजेपीच्या दास, रांका यांची सात दिवसानंतर तिहार तुरुंगातून सुटका

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– जंतर-मंतर येथील प्रतिबंधित आंदोलन क्षेत्रात प्रवेश केल्याप्रकरणी अटकेत असलेले 'कॉक्रोच जनता पार्टी'चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांची सात दिवसांनंतर कारागृहातून सुटका झाली आहे. दिल्ली पोलिसांच्या कोठडी वाढवण्याच्या मागणीनंतरही विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी दोन्ही नेत्यांची सुटका करण्याचे आदेश बुधवारी दिले.

दिल्ली पोलिसांनी दास आणि रांका यांच्या न्यायालयीन कोठडीत आणखी तीन दिवसांची वाढ करण्याची विनंती दंडाधिकाऱ्यांकडे केली होती. यावर झालेल्या



सुनावणीदरम्यान दोन्ही नेत्यांच्या वतीने जामीनदार सादर करण्यात आले. दंडाधिकाऱ्यांनी पोलिसांची मागणी फेटाळून लावत दोन्ही नेत्यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा केला.

१४ ऑक्टोबर रोजी जंतर-मंतर क्षेत्रात विनापरवानगी प्रवेश केल्याचा आणि शांतता भंगाचे बॉण्ड मोडल्याचा आरोप दास आणि रांका यांच्यावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले असता, सुरुवातीला त्यांना ५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर १९ ऑक्टोबर रोजी त्यांच्या कोठडीत पुन्हा दोन दिवसांची वाढ करण्यात आली होती, ज्याची मुदत बुधवारी संपत होती.

दरम्यान, दोन्ही नेत्यांच्या न्यायालयीन कोठडीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयातही सुनावणी झाली. मात्र, उच्च न्यायालयाने या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे.

# शेतकऱ्यांना विनाविलंब पीक कर्ज द्या; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे बँकांना निर्देश

## नांदेडमधील बँकांना अचानक भेट; पीक कर्ज प्रकरणांचा आढावा, शेतकऱ्यांशी साधला संवाद

**नांदेड (प्रतिनिधी)**– शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यात कोणतीही अडचण येऊ नये, तसेच पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बुधवारी नांदेड शहरातील बँकांच्या अचानक भेटीदरम्यान दिले. नवा मोंढा येथील भारतीय स्टेट बँक, वजिराबाद येथील महाराष्ट्र ग्रामीण, तारासिंग मार्केट येथील पंजाब नॅशनल बँक आणि युनियन बँकेला भेट देऊन त्यांनी पीक कर्ज वितरणासह अन्य कर्ज प्रकरणांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बँकेत उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून त्रास देऊ नये. उपलब्ध सुविधांचा वापर करून ऑनलाईन सातबारा उतारा प्राप्त करावा आणि पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब पीक कर्ज मंजूर करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बँक अधिकाऱ्यांना दिले. कर्ज मंजुरीची प्रक्रिया सुलभ करून शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध होईल, यासाठी बँकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांमधील प्रलंबित कर्ज प्रकरणे, शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले अर्ज, आवश्यक कागदपत्रांबाबत निर्माण होणाऱ्या अडचणी आणि त्यावर काढता येणारे पर्याय यांची सविस्तर माहिती घेतली. सामाईक क्षेत्रातील शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देताना येणाऱ्या अडचणींबाबतही त्यांनी बँक अधिकाऱ्यांशी चर्चा केली. अशा प्रकरणांमध्ये नियमानुसार योग्य पर्याय शोधून कर्ज वितरणाची कार्यवाही सुलभ करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

पीक कर्ज हे शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजांसाठी महत्त्वाचे असल्याने कर्ज वितरण प्रक्रियेत अनावश्यक विलंब होणार नाही, याची बँकांनी खात्री करावी. शेतकऱ्यांच्या अर्जांवर वेळेत कार्यवाही करून पात्र



लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी यांच्यासोबत जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बी. जी. सोनकांबळे, तहसीलदार संजय वारकड, जिल्हा पशुसंवर्धनचे उपायुक्त डॉ. प्रविणकुमार घुले यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.






# जिल्हाभरात विजयादशमी थाटात साजरी; बालाजीचा रथ ओढण्यासाठी भाविकांची गर्दी

## झेंडूचे दर कोसळले

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरासह संपूर्ण जिल्ह्यात मंगळवारी विजयादशमीचा (दसरा) सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळपासूनच बाजारपेठांमध्ये झेंडूची फुले आणि आपट्याची पाने (सोने) घेण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली.

गेल्या दोन वर्षी दसऱ्याला झेंडूच्या फुलांना ८० ते १०० रुपये किलो असा चांगला भाव मिळाला होता. त्यामुळे यंदाही चांगला भाव मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी पाणीटंचाई असतानाही मोठ्या प्रमाणावर झेंडूची शेती फुलवली होती. मात्र मंगळवारी बाजारात आवक प्रचंड वाढल्याने फुलांना




कवडीमोल भाव मिळाला. काही ठिकाणी १५ ते २० रुपये किलो दरानेही फुले विकावी लागल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

बाजारात गर्दी असूनही दर कोसळल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. पाणी नसताना टँकरने पाणी घालून फुलं जगवली, पण आज बाजारात २० रुपयांनाही कोणी घेत नाही, अशी व्यथा उमरी, धर्माबाद, बिलोली भागातील शेतकऱ्यांनी बोलून दाखवली.

दुसरीकडे नागरिकांनी एकमेकांना 'सोनं घ्या, सोन्यासारखं रहा' अशा शुभेच्छा देत आपट्याची पाने वाटली. सायंकाळी जुना मोंढा परिसरातील श्री बालाजी मंदिरात बालाजीचा पारंपरिक रथ ओढण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसर सोन्याने (आपट्याच्या पानांनी) लुटण्यात आला.

दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने आज सकाळी शहराच्या विविध भागांत गणवेशात पथसंचलन करण्यात आले. स्वयंसेवकांनी घोषवाक्ये देत शिस्तबद्ध संचलन केले. ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले.

शहरांमधील नविन मोंढा मार्केट कमिटी मैदान, गाडीपुरा बालाजी मंदिर परिसर, बजरंग कॉलनी एमजीएम कॉलेज परिसर आणि सिडको- हडको परिसरामध्ये रावण दहन करण्यात आले. या कार्यक्रमाला खासदार अशोकराव चव्हाण, आमदार अमरनाथ राजुरकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासह विविध पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा**

विजयादशमीनिमित्त शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यासमोर तसेच शहरातील विविध बौद्ध विहारांमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. यावेळी बुद्ध वंदना घेऊन तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच सम्राट अशोक यांच्या चरणी अनुयायांनी अभिवादन केले.

# टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात आणखी पाच जणांना अटक

**मुंबई (प्रतिनिधी)**– अभिनेता टायगर श्रॉफ याच्या मोटारगाडीवर जुहू येथे झालेल्या गोळीबारप्रकरणाचा तपास अधिक व्यापक झाला असून, शस्त्रपुरवठा, हल्लेखोरांना मदत आणि त्यांच्या पलायनाच्या व्यवस्थेशी संबंधित आणखी पाच आरोपींना अटक करण्यात आली. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाच्या मदतीने चार आरोपींना, तर हरियाणा पोलिसांच्या मदतीने एका आरोपीला अटक करण्यात आली. यापूर्वी राजस्थानमधील कोटा येथून तीन प्रमुख संशयितांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आठ झाली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# चीन-पाकिस्तान सीमा सहकार्य: नवे आव्हान

भारताच्या सार्वभौमत्त्वाला आव्हान देणाऱ्या कोणत्याही कृतीला कायदेशीर मान्यता मिळू शकत नाही, ही भारताची भूमिका जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या संदर्भात स्पष्ट आहे. पाकिस्तानने चीनसोबत स्थापन केलेल्या संयुक्त सीमा आयोगाच्या पार्श्वभूमीवर भारताने पुन्हा एकदा ही भूमिका ठामपणे मांडली आहे. पाकिस्तानच्या बेकायदा ताब्यातील भारतीय भूभागाबाबत तिसऱ्या देशासोबत कोणतीही सीमा व्यवस्था करण्याचा पाकिस्तानला अधिकार नाही, असे भारताने स्पष्ट केले आहे. मात्र, या घोषणेपुरतेच मर्यादित न राहता त्यामागील सामरिक परिणामांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ भारतावर आली आहे. नुकतेच पाकिस्तानने चीनसोबत संयुक्त सीमा आयोग कार्यान्वित केल्याची घोषणा केली. सीमा व्यवस्थापन, संयुक्त सीमा सर्वेक्षण, व्यापारमार्ग आणि लोकांमधील संपर्क वाढविणे, अशी या आयोगाची उद्दिष्टे सांगितली जात आहेत. प्रत्यक्षात मात्र या सहकार्याचा भौगोलिक केंद्रबिंदू पाकिस्तानव्याप्त जम्मू-काश्मीर, गिलगिट-बाल्टिस्तान आणि शक्सगाम खोरे या भारताच्या दाव्यातील प्रदेशांशी संबंधित आहे. त्यामुळे हा केवळ प्रशासकीय किंवा सीमाव्यवस्थापनाचा विषय मानणे धोकादायक ठरेल. भारताने १९६३ मध्ये पाकिस्तानने चीनसोबत केलेल्या सीमा करारालाही बेकायदा आणि अवैध ठरविले आहे. या कराराद्वारे पाकिस्तानने शक्सगाम खोऱ्यातील भूभाग चीनला दिला होता. भारताच्या दृष्टीने हा प्रदेश भारतीय भूभागाचा भाग असल्याने पाकिस्तानला त्याबाबत कोणताही करार करण्याचा अधिकारच नाही. चीन-पाकिस्तान सीमा सहकार्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वावर कायदेशीर परिणाम होत नसल्याचे भारताने स्पष्ट केले असले, तरी प्रत्यक्ष भू-राजकीय परिस्थितीत त्याचे परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत. यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधून जाणाऱ्या या प्रकल्पामुळे चीनला अरबी समुद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग मिळतो. आता सीमा सर्वेक्षण, मालवाहतूक, सीमा व्यवस्थापन आणि संभाव्य सुरक्षा समन्वयाला संस्थात्मक स्वरूप मिळाल्यास भारताच्या उत्तरेकडील सीमांवर चीन आणि पाकिस्तानचे सहकार्य अधिक दृढ होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती भारतासाठी केवळ राजनैतिक आव्हान नाही, तर दीर्घकालीन सामरिक चिंतेचा विषय आहे. विशेष म्हणजे, ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारत आणि चीनच्या नेतृत्वामध्ये चर्चा झाली असतानाच चीन-पाकिस्तान सीमासहकार्याची घोषणा झाली. भारत-चीन संबंधांमध्ये सीमावाद हा आधीपासूनच संवेदनशील विषय आहे. अशा परिस्थितीत चीनने पाकिस्तानसोबत सीमाविषयक सहकार्य वाढविणे ही बाब भारताने व्यापक प्रादेशिक समीकरणांच्या संदर्भात तपासणे आवश्यक आहे. मात्र, या आव्हानाला उत्तर देताना भारताने भावनिक किंवा घाईघाईची भूमिका घेणे परवडणारे नाही. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेल्या कोणत्याही प्रशासकीय हालचालीला लष्करी शक्तीने थांबविण्याचा प्रयत्न केल्यास परिस्थिती थेट संघर्षाच्या दिशेने जाऊ शकते. भारतासमोर एकाच वेळी पश्चिम आणि उत्तरेकडील सीमांवर तणाव निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे प्रत्येक कृतीचा व्यापक सामरिक परिणाम लक्षात घेऊन पावले उचलावी लागतील. हल्लीच्या काही वर्षांमध्ये चीन, पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारताला अडचणीत आणण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत. वरवर चर्चा करण्याचे नाटक केले जाते, परंतु प्रत्यक्षात मात्र काळे व्यवहार चालूच आहेत. भारताची ताकद केवळ लष्करी क्षमतेत नाही. आर्थिक सामर्थ्य, राजनैतिक प्रभाव, आंतरराष्ट्रीय कायदा, बहुपक्षीय व्यासपीठे आणि प्रादेशिक भागीदारी यांचा प्रभावी वापर करणे तितकेच आवश्यक आहे. पाकिस्तानव्याप्त भारतीय भूभागासंदर्भातील भारताची कायदेशीर भूमिका सातत्याने आणि ठोस पुराव्यांसह आंतरराष्ट्रीय पातळीवर मांडली पाहिजे. चीन-पाकिस्तानच्या प्रत्येक नव्या कराराचे स्वरूप, त्यातील तरतुदी आणि त्याचे भारताच्या सुरक्षेवरील परिणाम यांचा बारकाईने अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र धोरणात्मक यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. सीमेवरील वास्तव बदलण्याचा प्रयत्न झाला की केवळ निषेध नोंदविणे पुरेसे नसते. त्याला राजनैतिक, आर्थिक आणि सामरिक प्रत्युत्तराची जोड आवश्यक असते. भारताने संवादाचे दरवाजे उघडे ठेवतानाच आपल्या सार्वभौमत्वाच्या प्रश्नावर कोणतीही संदिग्धता राहणार नाही, असा संदेशही द्यायला हवा. चीन-पाकिस्तानचे वाढते सीमासहकार्य ही एका दिवसात निर्माण झालेली समस्या नाही. ती दीर्घकालीन रणनीतीचा भाग आहे. त्यामुळे भारताची प्रतिक्रियाही तात्कालिक न राहता दीर्घकालीन आणि बहुआयामी असली पाहिजे. पाकिस्तानव्याप्त भारतीय भूभागावरील दावा हा केवळ भावनिक मुद्दा न बनविता कायदा, कुटनीती, अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीत पुढे नेणे, हाच या नव्या आव्हानाला सामोरे जाण्याचा अधिक परिणामकारक मार्ग ठरू शकतो.

# पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी आजच नियोजन हवे!



पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. पाण्याशिवाय सजीवसृष्टीचे अस्तित्त्व शक्य नाही. शेती, उद्योग, पशुधन, मानवी जीवन आणि पर्यावरण या सर्वांचे भवितव्य पाण्यावर अवलंबून आहे. मात्र, वाढती लोकसंख्या, अनियमित पाऊस, भूजलाचा अमर्याद उपसा, पाण्याचा वाढता अपव्यय आणि जलस्रोतांचे प्रदूषण यामुळे पाण्याचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना त्याचा वापर मात्र अमर्यादित पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून आजच नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. उद्याच्या पाणीटंचाईवर मात करायची असेल, तर आजपासूनच पाणीबचतीचा संकल्प करावा लागेल.

महाराष्ट्रासारख्या राज्यात पावसाचे वितरण असमान आहे. काही भागांत अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर काही भागांत पावसाअभावी दुष्काळाचे सावट गडद होते. पावसाचे पाणी वाहून जाऊन समुद्राला मिळते; मात्र ते अडविण्यासाठी, जिरविण्यासाठी आणि भविष्यातील वापरासाठी साठविण्यासाठी आवश्यक प्रयत्न अनेक ठिकाणी अपुरे पडतात. पावसाळ्यात पाण्याची उपलब्धता वाढली की त्याचे महत्त्व कमी जाणवते; परंतु उन्हाळा सुरू झाला की पाण्यासाठी वणवण करावी लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी पावसाच्या प्रत्येक थेंबाचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पाणीटंचाई ही केवळ निसर्गाची समस्या नाही, तर ती मानवी नियोजनातील त्रुटींचाही परिणाम आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, जलस्रोतांचे संवर्धन आणि पावसाच्या पाण्याचे संकलन या गोष्टींना प्राधान्य दिल्यास पाणीटंचाईची तीव्रता कमी करता येऊ शकतपाण्याच्या नियोजनाची सुरुवात गावपातळीपासून व्हायला हवी. गावातील नाले, ओढे, तलाव, विहिरी आणि जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे. शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, जलपुनर्भरण आणि छतावरील पावसाचे पाणी साठविणे यांसारख्या उपाययोजनांचा प्रभावीपणे अवलंब केला पाहिजे. मात्र, केवळ जलसंधारणाची कामे करून चालणार नाही, तर त्या कामांची गुणवत्ता, पाण्याचा प्रत्यक्ष साठा आणि भूजलपातळीवरील परिणाम यांचाही नियमित आढावा घेतला पाहिजे.प्रत्येक गावाने आपले जलबजेट तयार करण्याची वेळ आली आहे.

गावात वर्षभरात किती पाऊस पडतो, किती पाणी उपलब्ध होते, किती पाणी शेतीसाठी आणि पिण्यासाठी लागते, भूजलाचा किती उपसा होतो आणि पाण्याची किती बचत करता येईल, याचा हिशेब ठेवला पाहिजे. उपलब्ध पाण्यानुसार वापराचे नियोजन केल्यास भविष्यातील संकटाची तीव्रता कमी करता येईलशेती हा पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे शेतीतील पाणी व्यवस्थापनाला विशेष महत्त्व आहे. पारंपरिक सिंचन पद्धतींमुळे अनेकदा पाण्याचा अपव्यय होतो. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींचा वापर केल्यास पाण्याची बचत करून पिकांना आवश्यक तेवढे पाणी देता येतशेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन पीकपद्धतीचे नियोजन करणे आवश्यक आहे.

कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना योग्य प्राधान्य देणे, जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी आच्छादनाचा वापर करणे, सिंचनाच्या योग्य वेळा निश्चित करणे आणि पावसाच्या पाण्याचे शेतातच संधारण करणे या उपायांचा अवलंब करावा. पाणी उपलब्ध आहे म्हणून त्याचा अमर्याद वापर करणे योग्य नाही. पाण्याचा प्रत्येक थेंब पिकाच्या उत्पादनवाढीसाठी उपयोगी पडेल, अशा पद्धतीने सिंचन व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे. पाण्याचे नियोजन केवळ शासनाची किंवा शेतकऱ्यांची जबाबदारी नाही. प्रत्येक नागरिकानेही त्यात योगदान दिले पाहिजे. घरातील नळ सुरू ठेवून पाणी वाया घालविणे, गळणारे नळ आणि पाइपलाइन दुरुस्त न करणे, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरणे या सवयी बदलल्या पाहिजेत. घराच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संकलन करणे, वापरलेल्या पाण्याचा योग्य पुनर्वापर करणे आणि परिसरातील जलस्रोत स्वच्छ ठेवणे यांसारख्या उपायांनी मोठा बदल घडवून आणता येऊ शकतशाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि सामाजिक संघटनांनी पाणीबचतीबाबत जनजागृती करावी. पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली नैसर्गिक संपत्ती नसून पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची जबाबदारी आहे, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.विहिरी आणि बोअरवेलच्या माध्यमातून भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा होत आहे. मात्र, त्या प्रमाणात भूजलाचे पुनर्भरण होत नसल्याने अनेक भागांत पाणीपातळी खालावत आहे.

भूजलाचा अनियंत्रित वापर सुरू राहिल्यास भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतयासाठी पावसाचे पाणी जमिनीत मुरविणाऱ्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. विहिरींचे पुनर्भरण, जलसंधारणाची कामे, नैसर्गिक जलप्रवाहांचे संरक्षण आणि भूजल उपशावर स्थानिक पातळीवर योग्य नियंत्रण या बाबी महत्त्वाच्या आहेत. पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच त्याचे स्रोत टिकवून ठेवण्यावरही भर दिला पाहिजे. अन्यथा, आज उपलब्ध असलेले पाणी उद्या संपण्याचा धोका नाकारता येणार नाही. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या योजना महत्त्वाच्या असल्या, तरी केवळ सरकारी प्रयत्न पुरेसे ठरणार नाहीत. जलसंधारणाच्या कामांमध्ये ग्रामस्थांचा सहभाग, पाणी वापराचे सामूहिक नियोजन आणि जलस्रोतांच्या देखभालीची जबाबदारी स्थानिक समुदायाने स्वीकारणे आवश्यक आहे.

गावातील पाणीवापराचे नियम ग्रामसभेत ठरविणे, जलसाठ्यांची नियमित देखभाल करणे, पाण्याचा अपव्यय रोखणे आणि उपलब्ध पाण्याचे न्याय्य वाटप करणे यासाठी सामूहिक प्रयत्न झाले पाहिजेत. पाणी हा केवळ वैयक्तिक वापराचा विषय नसून सामाजिक आणि सार्वजनिक हिताचा विषय आहे. त्यामुळे पाण्याच्या नियोजनात सर्व घटकांना सहभागी करून घेणे गरजेचे आहपाण्याचे संकट निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वी नियोजन करणे अधिक शहाणपणाचे आहे. पाऊस कधी आणि किती पडेल, यावर आपले नियंत्रण नसले, तरी उपलब्ध पावसाच्या पाण्याचा वापर कसा करायचा, त्याची साठवण कशी करायची आणि भविष्यासाठी त्याचे संवर्धन कसे करायचे, हे निश्चितपणे आपल्या हातात आहे.

आज पाण्याचा प्रत्येक थेंब जपला, तर उद्याच्या पिढीला पाण्यासाठी संघर्ष करावा लागणार नाही. पाण्याचा अपव्यय रोखणे, जलसंधारणाला गती देणे, शेतीत आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर वाढविणे आणि पाणी वापराचे शास्त्रीय नियोजन करणे या गोष्टी केवळ पर्याय राहिलेल्या नाहीत, तर त्या काळाची अनिवार्य गरज बनल्या आहेत. पाण्याचे संकट हे केवळ उन्हाळ्यात जाणवणारे संकट नाही, तर वर्षभराच्या नियोजनाशी संबंधित आव्हान आहे. त्यामुळे पाण्याचे महत्त्व संकटाच्या काळात नव्हे, तर पाणी उपलब्ध असतानाच ओळखले पाहिजे. प्रत्येक गावाने जलबजेट तयार करावे, प्रत्येक शेतकऱ्याने पाणीबचतीचा विचार करावा आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याचा जबाबदारीने वापर करावा. कारण पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे. आज त्याचे नियोजन केले, तरच उद्याचे जीवन सुरक्षित राहील.

**-प्रा. संजय बडे**
दहेगाव ता. वैजापूर जि. छ. संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९

# मानवी शरीर हीच खरी संपत्ती



मानवी शरीर निसर्गाचा एक अद्भूत चमत्कार आहे. आपल्या जीवन प्रवासात शरीर आणि आपली इंद्रिये ही अत्यंत महत्त्वाची संपत्ती आहे. ज्या संपत्तीचे मूल्य कधीही पैशात मोजता येणार नाही.सर्व प्रगतीचा तो आरंभबिंदू आहे. या संपत्तीशिवाय होणारी प्रगती मनुष्याला निखळ सुखापर्यंत नेऊ शकत नाही. मनुष्य जीवनाचे अंतिम ध्येय हे निखळ आणि निरागस आनंदात दडलेले आहे. त्यामुळे सशक्त शरीर असेल तर अनेक दुःखावर मात करून सुखाच्या मार्गाकडे वाटचाल करणे. आपल्या ध्येयाची दिशा ठरविणे आणि त्यासाठी अतोनात कष्ट उपसण्याची तयारी ठेवणे शक्य आहे. केवळ इच्छाशक्ती आहे, पण शरीर साथ देत नाही त्या व्यक्तीला त्याच्या आंतरिक इच्छेला लगाम घालावा लागतो.

शरीर संपत्ती मिळविण्यात अपयशी ठरलेले युवक उसळते साहस घेऊन जगण्याच्या ऐन उमेदीत आपल्या आजारांचे कौतुक करीत फिरताना दिसतात. कोणत्याही कार्यकर्तृत्वाचा आनंद घेण्यासाठी असमर्थ ठरलेल्या युवकांना आपले जीवन भकास वाटू लागते. त्यामुळे शरीर ही संपत्ती आहे, ते एक नादमधुर संगीत आहे, तो जीवनातील सर्वोच्च आनंद आहे, नव्हे तो स्वर्ग आहे. शरीराची महती स्पष्ट करताना खूप ज्येष्ठ व श्रेष्ठ विचारवंतांनी हे अनेकदा आपल्यासारख्या पामरांना सांगितले आहे. पण जेंव्हा तरुणाईचे उसळते साहस रोमारोमांत संचार करते तेव्हा या शरीरधनाची जोपासना करणे, त्यामधून दीर्घायुरोग्य प्राप्त करुन घेणे आणि जीवनप्रवासातील दीर्घायुष्याचा परमोच्च आनंद घेणे या गोष्टीचा आम्हाला विसर पडतो. हे अगदी सहजसाध्य झाले आहे. यासाठी कोणतेही कष्ट घ्यावे लागले नाही. त्यामुळे जीवनातील व्यसनाधीनता, अविचार, वाममार्ग याचे आम्ही एवढ्या सहजपणे समर्थन करतो. त्या समर्थनामुळे भावी जीवनात निर्माण होणाऱ्या संकटाची तमा बाळगण्याची गरज युवकांना वाटली पाहिजे. उसळत्या साहात विचारी बीजे रुजलेली असतील तर ती शक्ती सकारात्मक कार्याच्या दिशेने वाटचाल करेल. दिशाहीन उसळते साहस वाममार्गाच्या दिशेने वाटचाल करीत असेल तर ते शरीरधन युवाशक्तीच्या नाशाला कारणीभूत ठरते. युवाशक्तीकडे अत्यंत आशेने पाहणाऱ्या पालकांचा आधार जो युवक होऊ शकत नाही. ते शरीरधन काय उपयोगाचे? आपल्या शक्ती दिशाहीन होणार नाही. हा विचार घेऊनच युवकांची दिनचर्या असली पाहिजे.

मानवी शरीर निसर्गाची अनमोल देणगी आहे. त्याचा उपयोग अविचाराने केल्यामुळे ज्यावेळी शरीर असंख्य व्याधींनी ग्रस्त होते. तेव्हा निर्माण होणारी सद्बुद्धी, हे वेळ निघून गेल्यानंतरचे शहाणपण आहे. आपल्या शहाणपणाचा उपयोग योग्य वेळीच करता आला पहिजे. देहमंदिरावर आजाररूपी राक्षसी हल्ले होऊ लागल्यावर आम्ही जागे होतो. त्यानंतर वैद्यकीय इलाज करणे सुरू होते. पण एकदा का आजार रूपी हल्ले सुरू झाल्यावर बचावात्मक पवित्रा घेऊन करण्यात येणारे इलाज किती परिणामकारक ठरतील याची शाश्वती देता येत नाही. मनाचे आणि विचारांचे सामर्थ्य कोणत्याही औषधापेक्षा श्रेष्ठ असते.तेंव्हा त्या सामर्थ्याचा विचार आम्हाला केंव्हाच पडता कामा नये.

आपल्या आरोग्यावरच आपले मन, बुद्धी, भावना ह्यांची अवस्था अवलंबून असते. मनाविषयी विचार करताना अंतर्मन व बहिर्मन अशा दोन्ही अवस्थेचा विचार प्रामुख्याने आपल्याला करावा लागेल. दोन्ही मनात सुरू असलेले द्वंद्व हे बरेच वेळा न संपणारे असते. याचे महत्त्वाचे कारण अंतर्मनात सुरू असणाऱ्या आंतरक्रिया बहिर्मनाशी जुळत नाहीत.सारांश आत चालले काय, आणि बाहेर दाखवतो काय? अशी अवस्था प्रामुख्याने बऱ्याच युवकांची आपल्याला दिसते.

दिसणे आणि असणे हे जर प्रामुख्याने वेगवेगळे असेल तर आपली नेहमीच फसगत होत राहते. हे दिसणे व असणे इतरांची फसवणूक करण्याच्या संदर्भात नसेल तर एक वेळ ते फारसे घातक ठरणार नाही, पण पुढे असा प्रश्न निर्माण होतो की आपण स्वप्रतारणा का करावी? मुक्त, स्वच्छंदी अगदी निर्मळ झऱ्यासारखं का जगता येऊ नये? बहुतांशी अतिसंकोची, अव्यक्त स्वभावाचे युवक मोठ्या प्रमाणात स्वप्रतारणा करून घेतात. त्याचे महाभयंकर दुष्परिणाम ते भोगत असतात.

असणे आणि भासवणे ही एक प्रचंड कला आहे, असे समजणारे अनेक महाभाग असतात. त्यामुळे अगदी सहजपणे बनवाबनवी करण्यात आपण यशस्वी होतो. हा दृढविश्वास असणारे युवक आपल्या जीवनातील विश्वासाहर्ता तर गमावतातच, पण यांच्या अंतर्मनात व बहिर्मनात नेहमीच सुरू असणारे महायुद्ध यांच्या मनोविश्वाचा विध्वंस करीत असते. काही कालावधीची 'अशी ही बनवाबनवी' नेमकी आपल्याला अगदी कडेलोटाच्या शिखरावर कशी घेऊन गेली? त्यानंतर ती आपल्या भवितव्याची 'कशी ही बनवाबनवी' झाली. हे या महान कलाकाराला कळत नाही. जेव्हा कळते, तेव्हा त्या कळण्याचा काहीच उपयोग नसतो, कारण चुकीच्या मनो व्यापारामुळे त्याने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमावलेला असतो.

युवावस्थेत ही बाब खूप लक्षात घेण्यासारखी आहे, आपण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमविता कामा नये आपल्या बुद्धीचा होणारा विकास आपल्याला स्वार्थाकडे, कुसंगतीकडे किंवा वाममार्गाकडे नेऊ शकतो, पण आपल्या मनाचा आणि भावनेचा विकास आपल्याला केंव्हाच वाईट दिशेने नेऊ शकत नाही. मन, भावना आपल्याला मानवी शरीरातील यंत्र बनू देत नाहीत. आपल्या अगोदर इतर व्यक्तीच्या सुख-दुःखाचा विचार करायला लावते ते मानवी मन. ते आपल्याला या पर्यावरणातील प्रत्येक जीवसृष्टीचा विचार करायला लावते. पशु,पक्षी, प्राणी, वृक्ष, वल्ली या चराचरात ते आपल्याला आत्मा आणि परमात्माचा विचार करायाला लावते. जेंव्हा बाल्यावस्थेपासून मानवी जीव हा विचार करायला लागतो. तेंव्हा त्याला वेगळ्या ईश्वरभक्तीची गरज नाही. तो प्रत्येक जीवाशिवातील ईश्वरापर्यंत पोहचतो. तो जीवसृष्टीत एकरूप होतो. तो मानवी जीवनाचा खराआनंद घेतो. इहलोकीचा मोक्ष तोच पाहतो आणि क्षणोक्षणी ईश्वरभक्तीचा आनंद तोच घेतो.

ईश्वर आपले मनोरथ तेंव्हाच पूर्ण करेल जर तुमचा प्रयत्नवादावर पूर्ण विश्वास असेल. माउलीने पसायदानात उल्लेख केला. जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात पण याचा अर्थ समजून घेतांना केवळ भक्तीने ते प्राप्त होऊ शकणार नाही.त्याला तुमची अपार मेहनत, शक्ती,बुद्धी,नियोजन सर्वच गोष्टीची जोड हवी. ईश्वरभक्ती यासाठी आवश्यक आहे. मला सदविचाराचा व सत्कार्याचा विसर पडू नये. माझ्या मनात राग, द्वेष, कुवासना, लालसा निर्माण होऊ नये. इतरांचे सुख, आनंद पाहून माझ्या मनात द्वेष निर्माण होऊ नये. मला माणूस म्हणून आनंदात जगता यावं. प्रत्येक प्रसंगी माझ्या मनात सकारात्मक विचारांचा वास असावा.ईश्वरभक्ती, नामस्मरण यासाठी आहे. ईश्वरभक्तीचे केवळ नाटक करून सर्वसामान्यांची फसवणूक करणारे काही थोडे नाहीत. मनुष्य वर्तनासंबंधी विचार केला असता 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असणारच. मनुष्यवर्तनासंबंधी निश्चित निष्कर्ष काढणे खूप कठीण आहे. मनुष्यजीवन असंख्य अनिश्चिततेने, संघर्षाने व थोडक्यात युद्धाने भरलेले आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात,
रात्रन दिन आम्हा युद्धाचा प्रसंग।।
अंतर्बाह्य जग आणि मन।।

ज्याचा मन आणि भावनांवर ताबा तो जग जिंकू शकतो. त्याला अशक्य असे काही नाही. मन आणि भावना ताब्यात ठेवण्यासाठी आमच्या विचारांची व्यापकता वाढवून मनोनिग्रह करणे आवश्यक आहे. आमच्या युवाशक्तीला विचारांची व मनोनिग्रहाची जोड मिळो व ही शक्ती राष्ट्र कार्याच्या सत्कारणी लागो. हीच सर्व ज्येष्ठांची मनोकामना. या देशातील समस्त युवकांना राष्ट्रभक्तीचे महत्व कळेल, तेंव्हा आमच्या देशाचे भविष्य उज्ज्वल असेल, हे सांगण्यासाठी कोणत्या ही भविष्यवेत्याची गरज असणार नाही.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# सूर्यप्रकाशाची विक्री; विज्ञानाची झेप की, निसर्गाच्या चक्रात हस्तक्षेप?



अवकाशातून पृथ्वीवर सूर्यप्रकाश पोहोचविण्याची कल्पना तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची नांदी ठरू शकते. मात्र, निसर्गाने सर्व सजीवांसाठी मुक्तपणे उपलब्ध करून दिलेल्या प्रकाशाचे व्यापारीकरण करताना पर्यावरणीय परिणामांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. विज्ञानाची प्रगती माणसाच्या कल्पनाशक्तीला नवनव्या दिशा देत असते. कालपर्यंत अशक्य वाटणाऱ्या संकल्पना आज प्रत्यक्षात उतरत आहेत. आता तर सूर्यप्रकाशाची विक्री करण्याची कल्पनाही प्रत्यक्ष प्रयोगांच्या टप्प्यावर पोहोचत आहे. अमेरिकेतील 'रिफलेक्ट ऑर्बिटल' ही कंपनी पृथ्वीच्या कक्षेत महाकाय आरसे स्थापित करून मागणीनुसार विशिष्ट ठिकाणी सूर्यप्रकाश पोहोचविण्याच्या तयारीत आहे. भारतातील 'स्कायरूट एरोस्पेस' या कंपनीचाही या प्रयोगात सहभाग असणे ही भारतीय अवकाश उद्योगासाठी महत्त्वाची बाब आहे. परंतु या तंत्रज्ञानाकडे केवळ व्यावसायिक संधी म्हणून पाहून चालणार नाही. त्यातून निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय, वैज्ञानिक आणि नैतिक प्रश्नांचाही विचार करावा लागेल.

आज जग ऊर्जा संकट, हवामान बदल आणि वाढत्या औद्योगिक गरजांचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत सूर्यप्रकाशाचा मागणीनुसार पुरवठा करण्याची संकल्पना आकर्षक वाटणे स्वाभाविक आहे. दुर्गम भागातील उद्योग, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सुरू असलेल्या शोध आणि बचाव मोहिमा तसेच विशिष्ट परिस्थितीत सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांना या तंत्रज्ञानाचा फायदा होऊ शकतो. ढगाळ हवामानामुळे किंवा ऋतुमानातील बदलांमुळे सूर्यप्रकाश कमी मिळणाऱ्या ठिकाणी अतिरिक्त प्रकाश उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मानवी गरजांची पूर्तता करण्याची ही धडपड विज्ञानाच्या क्षमतेची जाणीव करून देते. मात्र, एखादी कल्पना तांत्रिकदृष्ट्या शक्य असणे आणि ती आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य व पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित असणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अवकाशात आरसे पाठविणे, त्यांची योग्य स्थिती कायम राखणे, पृथ्वीवरील विशिष्ट भागावर प्रकाश केंद्रित करणे आणि त्यासाठी लागणारा प्रचंड खर्च पेलणे, या सगळ्याच बाबी आव्हानात्मक आहेत. या प्रकाशातून मिळणारी ऊर्जा प्रत्यक्ष सौरऊर्जा प्रकल्पांच्या तुलनेत किती किफायतशीर ठरेल, याचेही मूल्यमापन आवश्यक आहे. सूर्यप्रकाश पोहोचविण्याची ही यंत्रणा कार्यान्वित झाली, तरी तिचा वापर सर्वसामान्यांच्या हितासाठी होईल की केवळ मोठ्या उद्योगांच्या नफ्यासाठी, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

रशियाने १९९३ मध्ये अशाच प्रकारचा प्रयोग केल्याचा उल्लेख या संदर्भात महत्त्वाचा आहे. मात्र, पूर्वी एखादा प्रयोग यशस्वी झाला होता म्हणून त्याचा व्यापक व्यावसायिक वापरही सुरक्षित आणि व्यवहार्य ठरेल, असे मानता येत नाही. प्रयोगशाळेतील किंवा मर्यादित स्वरूपातील यश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे व्यावसायिक प्रक्षेपण यांत फरक असतो. त्यामुळे या तंत्रज्ञानाच्या प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र मूल्यमापन, पारदर्शक माहिती आणि पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास आवश्यक आहे. सूर्यप्रकाश विकण्याची कल्पना भविष्यातील ऊर्जा व्यवस्थेला नवी दिशा देऊ शकते. परंतु विज्ञानाचे यश केवळ माणसाला किती अधिक गोष्टी नियंत्रित करता येतात, यावर ठरत नाही; तर त्या क्षमतेचा वापर किती जबाबदारीने केला जातो, यावरही ठरते. निसर्गावर मात करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगण्यापेक्षा निसर्गाशी सुसंगत तंत्रज्ञान विकसित करणे अधिक शहाणपणाचे आहे.

अवकाशातून सूर्यप्रकाश आणण्याचा प्रयोग पुढे जात असताना त्याच्या आर्थिक फायद्यांइतकेच पर्यावरणीय नुकसान, वैज्ञानिक संशोधनावरील परिणाम आणि सामाजिक न्याय यांनाही महत्त्व दिले पाहिजे. नियमन, पारदर्शकता आणि स्वतंत्र वैज्ञानिक परीक्षण यांच्या चौकटीतच अशा प्रकल्पांना पुढे जाण्याची परवानगी मिळाली पाहिजे. अन्यथा, माणसाने सूर्यप्रकाशावर नियंत्रण मिळविण्याच्या प्रयत्नात पृथ्वीवरील जीवनाचे नैसर्गिक संतुलनच धोक्यात आणले, तर ती विज्ञानाची झेप न ठरता विकासाच्या संकल्पनेतील मोठी चूक ठरेल. सूर्यप्रकाश विकत घेण्याची वेळ येण्यापूर्वी, निसर्गाने विनामूल्य दिलेल्या प्रकाशाचे आणि अंधाराचे महत्त्व समजून घेणे हीच खरी वैज्ञानिक प्रगल्भता आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी आज जिल्ह्यात 'खेत बचाओ अभियान'

**नांदेड (प्रतिनिधी)–** जमिनीचे आरोग्य सुधारणे, रासायनिक खतांचा संतुलित वापर, जलसंधारण आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या निर्देशानुसार २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'खेत बचाओ अभियान' राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत हे अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना कृषी आयुक्तालयाकडून विभागीय व जिल्हास्तरीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

या अभियानांतर्गत माती परीक्षणावर आधारित खतांचा वापर, पीक विविधीकरण, पीक अवशेषांचे योग्य व्यवस्थापन आणि शाश्वत कृषी पद्धतींबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषी विद्यापीठांच्या समन्वयातून विविध उपक्रम राबविण्यात येतील.

अभियानाच्या माध्यमातून तेलबिया, कडधान्ये आणि फलोत्पादन पिकांना प्रोत्साहन देण्यासह भात कापणीनंतर पडीक राहणाऱ्या क्षेत्राचा कार्यक्षम वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच पीक अवशेष व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करून पराटी व पेंढा जाळण्यापासून शेतकऱ्यांना परावृत्त करण्यात येणार आहे. सेंद्रिय व नैसर्गिक निविष्ठांचा वापर, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबतही प्रशिक्षण व प्रात्यक्षिके आयोजित केली जातील.

अभियानाच्या कालावधीत शेतकरी मेळावे, प्रक्षेत्र भेटी, प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून मृदा आरोग्य पत्रिकेचा वापर, खतांचा संतुलित वापर, जलसंधारण, पाण्याचे पुनर्भरण व साठवणूक, तसेच 'प्रति थेंब अधिक पीक' या संकल्पनेचा प्रसार करण्यात येईल. यासोबतच शेतकरी ओळखपत्र तयार करणे व अद्ययावत करणे, प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग वाढविणे आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

राज्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी हे अभियान लोकचळवळ म्हणून राबवून शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवावे, असे आवाहन कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी केले आहे. शेतकरी बांधवांनी आपल्या जिल्ह्यातील कृषी कार्यालय, कृषी विज्ञान केंद्र आणि आत्मा कार्यालयाशी संपर्क साधून अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी, पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी आणि शेती अधिक शाश्वत बनविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विष्णुपुरी येथे वाचनप्रेरणा दिनानिमित्त वाचनालयातर्फे गुणवंतांचा गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** जि. प. हायस्कूल विष्णुपुरी येथील पहिली ते दहावीपर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून कै. किशनराव टिकाराम देशमुख सार्वजनिक वाचनालयातर्फे ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका यू. के. जाधव होत्या तर व्यासपीठावर कै. किशनराव टिकाराम देशमुख सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. गोविंद हंबर्डे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष माणिकराव हंबर्डे, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे आणि शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष विलास हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी भारतरत्न ए.पी.जे. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली. यावेळी डॉ. गोविंद हंबर्डे आणि माणिकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एपीजे कलाम यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या दशसूत्री शपथेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. मुख्याध्यापिका यू. के. जाधव यांनी अध्यक्षीय समारोप करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले. शिक्षक एम. ए. खदीर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमात उदय हंबर्डे, प्रवीण हंबर्डे, पी. पी. देशमुख, संतोष देशमुख, आनंद वळगे, सौ. नाईनवाड, सी. व्ही. इदलगावे आदींचे सहकार्य लाभले.

## सिडकोमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सवाचे आयोजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, चंद्रगुप्तनगरच्या वतीने विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव तसेच पथसंचलनाचे आयोजन २० ऑक्टोबर २६ रोजी करण्यात आले होते. हा कार्यक्रम सकाळी ७.३० वाजता सिडको, नांदेड येथील श्री स्वामी समर्थ केंद्र येथून सुरू झाला. अनेक ठिकाणी मुख्य मार्गावर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी प्रभागातील नगरसेवक उपस्थित होते.

विजयादशमी हा हिंदू समाजातील पुरुषार्थ, शौर्य आणि शक्ती जागरणाचा पवित्र सण मानला जातो. यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. समाजातील सज्जनशक्तीला संघटित करून राष्ट्रहित आणि मानव कल्याणासाठी कार्य करण्याचा संदेश या कार्यक्रमातून दिला गेला. या कार्यक्रमात नांदेड शहर कार्यवाह शमारोतीजी कमळापुरे यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले तर श्री बालाजी मंदिर, हडकोचे अध्यक्ष अरुणा दमकोंडवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते,

यावेळी पथसंचलन मार्गावर विविध ठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली. नांदेड दक्षिण जिल्हा शिवसेना प्रमुख विनय पाटील गिरडे, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, राजू लांडगे, सतिश बसवदे यांच्यासह पदाधिकारी यांनी उपस्थित राहुन पुष्पवृष्टी केली. पथसंचलन यशस्वीतेसाठी चंद्रगुप्तनगर कार्यवाह तुकाराम भारत बेस्ते व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## सर्वांनी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवणे गरजेचे -डॉ. पुरुषोत्तम डाड




**नांदेड (प्रतिनिधी)–**व्यावसायिक जीवन दैनंदिन ताणतणावाने गुंतागुंतीचे झाले असून, सर्वांनी आपले शारीरिक व मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवणे गरजेचे झाले आहे. त्याकारिता नियमित व्यायाम आणि स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन नांदेडचे सुप्रसिद्ध फिजिसियन डॉ. पुरुषोत्तम डाड यांनी केले. रविवारी हॉटेल चंद्रलोक येथे पार पडलेल्या २९ व्या अँड बंसीलाल काबरा आयकर - विक्रीकर व्याख्यानमालेत ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

तत्पूर्वी व्याख्यानमालेचे उद्घाटन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संजय कदम यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे व्याख्याते सीए प्रीतम बत्रा नागपूर, ॲड. बालाजी राजे, सीए विजय कालानी, सीए महेश तोतला, ॲड. सी. बी. दागडिया, ओमप्रकाश काबरा छत्रपती संभाजी नगर यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. पुरुषोत्तम डाड पुढे म्हणाले, नांदेड सारख्या शहरात कै. बंसीलाल काबरा यांच्या स्मरणार्थ सतत २९ वर्षांपासून आयकर - विक्रीकर विषयांवर एखादी व्याख्यानमाला अखंडितपणे आयोजित करणे एक मोठी सेवा आहे.

प्रथम सत्रातील वक्ते सीए प्रीतम बत्रा यांनी जीएसटीमधील बदल, प्रावधान आणि सुधारणा या विषयावर प्रभावीपणे मार्गदर्शन केले. त्यांनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.

ॲड. बालाजी राजे यांनी दुसऱ्या सत्रात आयकर कायद्यात वेळोवेळी होणारे बदल, नवीन आयकर कायदा तरतुदीं व त्यांना सामोरे जाण्यासाठी काय उपाययोजना करावी याचे सविस्तर मार्गदर्शन केले. तत्पूर्वी नांदेड येथील सीए किशन माठोरे आणि परभणी येथील ॲड. शंकर गुंडलवार यांचेसह परिवाराचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक गंगाबिशन कांकर यांनी केले. सीए प्रतिक काबरा यांनी आभार व्यक्त केले. ज्येष्ठ सदस्य रामचंद्र रंगनानी यांनी स्वागत गीत प्रस्तुत केले. सूत्रसंचालन सीए गोविन्द मुंदडा यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ॲड. जयप्रकाश काबरा, हर्षदभाई शहा, सीए प्रवीण पाटील, सीए जयप्रकाश फलोर, शम्भूभाई भानू, सीए पी. एच. गट्टानी, संपादक कृष्णा शेवडीकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## नांदेड शहरात चोरट्यांचा धुमाकूळ; दोन घरफोड्यांत ३३ लाखांचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात चोरट्यांनी दोन ठिकाणी घरफोड्या करून सुमारे ३३ लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. इतवारा आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही घरफोडीमध्ये तब्बल ३३ लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

शहरातील इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वा. ते दि. २० ऑक्टोबर रोजी पहाटे २.३० वाजताच्या दरम्यान लक्ष्मीनगर, देगलूर नाका येथे ही घरफोडीची घटना घडली. फिर्यादी शेख इब्राहिम चुनुमियाँ (वय ४४, रा. लक्ष्मीनगर, देगलूर नाका) हे घर बंद करून बाहेर गेले असता अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २९ लाख ९६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३५२/२०२६, कलम ३३१(४), ३०५(१) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर कैलासे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि जावेद पठाण करत आहेत.

**भाग्यनगर पोलीस ठाणे हद्द; २.९२ लाखांची घरफोडी**

१७ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३० वाजता ते दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता दरम्यान सिद्धेश्वर पार्क, वेदांतनगर येथे दुसरी घरफोडी झाली.

फिर्यादी सुरेश बालाजी गट्टुलवार (वय ३५, रा. सिद्धेश्वर पार्क, वेदांत नगर) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २ लाख ९१ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

## देगलूर पोलिसांची कारवाई; आंतरजिल्हा दुचाकी चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या, १४.१५ लाखांच्या २७ मोटारसायकली जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात वाढत्या वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत देगलूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

देगलूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दोन अट्टल दुचाकी चोरट्यांना जेरबंद करून दोन टप्प्यांत एकूण २७ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या असून, त्यांची एकूण किंमत १४ लाख १५ हजार रुपये आहे.

देगलूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४८७/२०२६, कलम ३०३(३) भारतीय न्याय संहिता अन्वये वाहन चोरीचा गुन्हा दाखल होता. तपासादरम्यान पोलिसांनी पहिल्या टप्प्यात शिवकुमार हनुमान कुन्हाडे (वय २८, रा. नायगाव, जि. नांदेड) यास अटक करून त्याच्याकडून १० मोटारसायकली (किंमत ४ लाख १० हजार रुपये) जप्त केल्या होत्या.

त्याचा साथीदार तुकाराम उर्फ बाळू गंगाधर गिरी (वय २५, रा. टाकळगाव, ता. नायगाव) हा खानापूर फाटा (देगलूर) येथे गाडी विक्रीसाठी आला असता अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला होता. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी तो सतत ठिकाणे बदलत होता.

उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट आणि प्रभारी अधिकारी वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने पुणे व इतर संभाव्य ठिकाणी पाठलाग करून बाळू गिरी यास शिताफीने ताब्यात घेतले. कसून चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवलेल्या व विक्री केलेल्या आणखी १७ मोटारसायकली (किंमत १० लाख ५ हजार रुपये) हस्तगत करण्यात आल्या. आरोपींनी या गाड्या स्वतःच्या व नातेवाईकांच्या असल्याचे भासवून कमी किमतीत विकून फसवणूक केल्याचे तपासात समोर आले आहे.

## रुचिरा बेटकर यांच्या 'धूळवाटेवरचे दिवस' कथेला राज्यस्तरीय पारितोषिक



**नांदेड (प्रतिनिधी)–** भगतसिंग श्रमिक फाउंडेशन आणि थवा प्रकाशन, हिंगोलीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय कथा लेखन स्पर्धेचा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. या स्पर्धेत नांदेड येथील लेखिका, कवयित्री रुचिरा बेटकर यांच्या 'धूळवाटेवरचे दिवस' या कथेला राज्यस्तरीय पारितोषिक जाहीर झाले आहे.

या स्पर्धेचे आयोजन शहीद भगतसिंग श्रमिक फाउंडेशनचे भाऊराव गाडे, गोडाती काळे, डॉ. राधिका देशमुख, रतन आडे, तसेच थवा प्रकाशन, हिंगोलीचे पारिजात देशमुख आणि गणेश येवले यांनी केले होते. लवकरच पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

पोटाची खळगी भरण्यासाठी खेड्यातून शहराकडे गेलेल्या तरुणाची गावाकडची ओढ, आई-वडिलांप्रती असलेली माया आणि त्यांच्याविषयीचा कळवळा 'धूळवाटेवरचे दिवस' या कथेतून रुचिरा बेटकर यांनी अत्यंत संवेदनशीलपणे रेखाटला आहे.

या पुरस्काराबद्दल ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी, मराठवाडा साहित्य परिषद, नांदेड शाखेचे अध्यक्ष बालाजी इबितदार, कार्यवाह प्रा. महेश मोरे, ज्येष्ठ लेखिका आशा पैठणे, शंकर वाडेवाले, दिगंबर कदम, कवयित्री अनिता दाणे, कथाकार राम तरटे, प्रा. ललिता बोकारे-शिंदे, जगन शेळके आदींनी रुचिरा बेटकर यांचे अभिनंदन केले आहे.

## कृषी पंपधारकांसाठी महावितरणची स्थानिक हेल्पलाईन सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील कृषीपंपधारक शेतकऱ्यांसाठी महावितरणकडून स्थानिक पातळीवर वीजविषयक तक्रार हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या वीजविषयक तक्रारींची नोंद करणे, महावितरणच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी समन्वय साधणे आणि तक्रारींच्या निवारणासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यासाठी महावितरण नांदेड मंडल कार्यालयामार्फत हेल्पलाईन क्रमांक ८०८७०५२८३० उपलब्ध करून देण्यात येत आहे. कृषीपंपधारकांनी रोहित्र (डीपी) जळणे, कृषी पंपाचा वीजपुरवठा खंडित होणे तसेच इतर तातडीच्या वीजविषयक समस्या उद्भवल्यास ८०८७०५२८३० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत नळगे विद्यालयाचा संघ प्रथम



**लोहा (प्रतिनिधी)–** जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत लोहा येथील कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालयाच्या १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक नामांकित शाळांच्या संघांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या सामन्यात नळगे विद्यालयाच्या मुलींनी अतिशय उत्तम खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या विजयामुळे त्यांची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशस्वी खेळाडूंचा सत्कार विद्यालयात करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष केरबाजी बिडवई, सचिव लक्ष्मीकांत बिडवई, शाळेचे मुख्याध्यापक अनिल हामदे, रवी चव्हाण, तांबोळी, जाधव आदी शिक्षकांनी सर्व यशवंत खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील विभागीय स्तराच्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शाळेतील प्राथमिक विभाग, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व क्रीडा शिक्षकांची उपस्थिती होती.

## वन्यजीव संवर्धनासाठी प्रा. एस. पी. चव्हाण यांचा ६९६ किलोमीटर सायकल प्रवास



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जैवशास्त्र संकुलातील प्रा. एस. पी. चव्हाण यांनी वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाचा संदेश देण्यासाठी ६९६ किलोमीटरचा सायकल प्रवास केला.

'अधिवास जोडणे व वन्यजीव जोपासणे' या ब्रीदवाक्यानुसार त्यांनी नांदेड-किनवट-हिंगोली-परभणी-लातूर-नांदेड असा प्रवास करून विद्यापीठाच्या चार उपकेंद्रांना भेटी दिल्या. यावेळी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना वन्यजीव संरक्षण, जैवविविधता आणि पर्यावरण संतुलनाचे महत्त्व पटवून दिले.

वयाच्या ५९ व्या वर्षी हा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, जैवशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. बी. एस. सुरवसे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## दुर्गा माता मंदिरात ललिता पंचमीनिमित्त सामूहिक कुंकूमार्चन व श्री दुर्गा सप्तशती पाठ उत्साहात संपन्न



**धर्माबाद (प्रतिनिधी)–** शहरातील पुरातन दुर्गा माता मंदिरात शारदीय नवरात्रोत्सव २०२६ निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे होते. त्या अनुषंगाने मंदिर परिसरात मंदिराची आकर्षक विद्युत रोषणाई, भक्तिमय वातावरण आणि देवीच्या जयघोषाने चैतन्य निर्माण झाले होते. दररोज सायंकाळी ७ वाजता महाआरती आणि त्यानंतर प्रसाद वितरणाचे नियोजन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले होते.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त दररोज विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. देवीच्या दर्शनासाठी आणि धार्मिक कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

अश्विन शुद्ध पंचमी अर्थात ललिता पंचमीच्या पावन पर्वानिमित्त दुर्गा माता मंदिरात भव्य स्वरूपात सामूहिक कुंकूमार्चन विधी तसेच सामूहिक श्री दुर्गा सप्तशती पाठाचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यात भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेत देवीची आराधना केली. मंत्रोच्चार, पूजाविधी आणि भक्तिमय वातावरणामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक चैतन्य अनुभवायला मिळाले.

नवरात्रोत्सवातील सर्व धार्मिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी दुर्गा माता मंदिर समिती विशेष परिश्रम घेत आहे.

भक्ती, श्रद्धा आणि धार्मिक परंपरेचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमांमुळे धर्माबाद शहरातील दुर्गा मंदिर नवरात्रोत्सवाला विशेष शोभा प्राप्त झाली होती.

## महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय शालेय वुशू स्पर्धेत सुयश



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा क्रीडा परिषद व नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा बॅडमिंटन हॉल नांदेड येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय वुशू स्पर्धेत महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत स्नेहा दुधमल, सोनाक्षी पोटभरे, रितिका गायकवाड, आकांक्षा हिप्परगेकर, अंजली चिंतोरे, सांची ढगे, वैष्णवी नरावाड, अनुजा पवार, प्रशीक वाघमारे व संकेत पाईकराव आदी खेळाडूंनी सुवर्णपदक प्राप्त केले. तर कोमल ससाने, प्रज्ञा वाघमारे, अनुष्का कांबळे, गंगासागर कांबळे, वैष्णवी वाघमारे, शैलजा डोळसे, निशा तिरमले, अवनी अष्टुरकर, साक्षी सावंत, आदित्य नवघडे, प्रितेश आढाव व सर्वेश भालेराव आदी विद्यार्थ्यांनी रौप्य पदक पटकावले.

या स्पर्धेत संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. मनीषा येरेकर यांनी जबाबदारी पार पाडली. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मारोती हांडे, प्राचार्या स्वाती मुनेश्वर, डॉ. प्रमोद वाघमारे, प्रा. रमेश पाटेकर, प्रा. रामेश्वर भालके, प्रा. डी. बी. थावरे, प्रा. पायल कावळे व प्रा. मनीषा येरेकर आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## नांदेडच्या त्रिपिटक बुद्ध विहारात धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा; अन्नदानासह विविध सामाजिक उपक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील देगावचाळ परिसरातील त्रिपिटक बुद्ध विहार येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन विविध सामाजिक उपक्रम राबवून आणि अन्नदान करून उत्साहात साजरा करण्यात आला.

त्रिपिटक बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष बंटी लांडगे यांच्या पुढाकारातून सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित अन्नदानाच्या उपक्रमातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.

बंटी लांडगे यांनी गोरगरीब व गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी मोफत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून दिली आहे. तसेच अनाथ व निराधार व्यक्तींना मदत करण्यासाठी ते सातत्याने पुढाकार घेतात. नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी स्वखर्चातून शहरातील विविध भागांत बोअरवेल करून दिल्या आहेत.

गोदावरी नदीकाठच्या परिसरात पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊन अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी पूरग्रस्तांना अन्नदान व धान्य किटचे वाटप करून मदत केली.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

**‘दृश्यम’ चित्रपटमालिकेतील रहस्य, उत्कंठा आणि कलाकारांच्या प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांना नेहमीच खिळवून ठेवले आहे. या चित्रपटांमधील कथानक आणि संवाद जितके प्रभावी आहेत, तितकेच त्यामध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित अनेक पैलूही अधोरेखित झाले आहेत. भीतीच्या सावटाखाली जगणे, सततचा मानसिक ताण, चिंतेचे झटके, मानसिक आघात आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी स्वतःला झोकून देण्याची वृत्ती यांचे चित्रण या चित्रपटांमधील काही संवादांतून दिसून येते. ‘दृश्यम’मधील विजय साळगावकर आणि त्याच्या कुटुंबाच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांमुळे निर्माण होणारा मानसिक ताण कथानकाला वेगळी खोली देतो. काही प्रसंगांमधून सुरक्षितता आणि मानसिक शांतता यांतील फरकही प्रकर्षाने जाणवतो.**





## प्रत्येक चाहुलीने दचकून जगणे म्हणजे आयुष्य नव्हे!

### ‘दृश्यम’ चित्रपटातून मानसिक आरोग्याचे गंभीर पैलू उलगडले



### ‘मला न्याय नको, बदला हवा!’

मीरा देशमुखच्या या संवादातून दुःख, संताप आणि सूडाच्या भावनेने एखाद्या व्यक्तीच्या विचारांवर कसा ताबा मिळवला जाऊ शकतो, याची कल्पना येते. एखाद्या दुःखद घटनेनंतर मनात निर्माण झालेली तीव्र भावना दीर्घकाळ कायम राहिल्यास व्यक्तीचे विचार आणि वर्तन प्रभावित होऊ शकते. मात्र, प्रत्येक व्यक्ती दुःखाला किंवा मानसिक आघाताला एकाच प्रकारे सामोरी जात नाही. अशा परिस्थितीत भावनिक आधार आणि गरजेनुसार तज्ज्ञांची मदत महत्त्वाची ठरते.

### विचार करण्याची क्षमता ढासळू शकते!

विजय साळगावकरच्या संवादातून भीती आणि संकटाच्या परिस्थितीत माणसाच्या निर्णयक्षमतेवर होणारा परिणाम अधोरेखित होतो. तीव्र तणावाच्या प्रसंगी काही व्यक्तींना योग्य- अयोग्य ठरवणे कठीण जाऊ शकते. काही जण घाईघाईने निर्णय घेतात, तर काही जण गोंधळून जातात. अशा वेळी शांत राहण्याचा प्रयत्न करणे, परिस्थितीचे आकलन करणे आणि विश्वासू व्यक्तीची मदत घेणे उपयुक्त ठरू शकते.

### ‘बरे असल्याचे नाटक करता येते; पण...

भूतकाळातील एखादी वेदनादायक घटना मनावर खोल परिणाम करू शकते. बाहेरून सर्व काही ठीक असल्याचे दाखवणारी व्यक्तीही आतून अस्वस्थ असू शकते. झोप न लागणे, वारंवार तीच घटना आठवणे, भीती वाटणे आणि सतत तणाव जाणवणे अशी लक्षणे काही व्यक्तींमध्ये दिसू शकतात. चित्रपटातील संवाद या भावनिक संघर्षाची जाणीव करून देतो. मात्र, अशी लक्षणे दीर्घकाळ टिकत असल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता मानसिक आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

### कुटुंबासाठी स्वत :ला विसरण्याची वेळ!

कुटुंबाचे संरक्षण करण्यासाठी एखादी व्यक्ती कितीही प्रयत्न करू शकते. मात्र, सततची धावपळ, भीती आणि जबाबदाऱ्यांचा वाढता भार यामुळे तिच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. विजय साळगावकरच्या भूमिकेतून कुटुंबासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या व्यक्तीचा भावनिक संघर्ष दिसतो. आपल्या प्रियजनांना सुरक्षित ठेवण्याच्या प्रयत्नांत स्वतःच्या गरजा, भावना आणि मानसिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. कुटुंबाची काळजी घेणे महत्त्वाचे असले, तरी स्वतःच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे.

### ‘सुरक्षितता-शांतता, खूप फरक असतो!’

चित्रपटातील सर्वाधिक लक्षवेधी संवादांपैकी एक म्हणजे, ‘साहेब, मी माझ्या कुटुंबाला सुरक्षित ठेवले; पण त्यांची मानसिक शांतता कायमची हिरावून घेतली. प्रत्येक चाहुलीने दचकून जगणे म्हणजे आयुष्य नव्हे!’ या संवादातून मानसिक आरोग्याचा एक महत्त्वाचा पैलू समोर येतो. एखादी व्यक्ती प्रत्यक्ष धोक्यापासून सुरक्षित असली, तरी तिच्या मनातील भीती संपलेली असेलच असे नाही. सतत काहीतरी वाईट घडेल, अशी शंका येणे, प्रत्येक आवाजाने दचकणे आणि आजूबाजूच्या परिस्थितीवर सतत लक्ष ठेवणे यामुळे व्यक्तीचे दैनंदिन जीवन प्रभावित होऊ शकते. अशा अनुभवांचा संबंध काही वेळा तीव्र तणाव किंवा मानसिक आघाताशी असू शकतो. मात्र, केवळ एखाद्या लक्षणावरून मानसिक विकाराचे निदान करता येत नाही.

- ‘मी इथेच उभा आहे, पहारेकरी बनून!’ : कुटुंबाला वाचवण्यासाठी सतत सज्ज राहणाऱ्या विजयच्या भूमिकेतून अतिसंरक्षणाची भावना आणि कायम सावध राहण्याची मानसिक अवस्था दिसून येते. सतत संभाव्य धोक्याचा विचार करत राहिल्यास व्यक्तीला विश्रांती घेणे, मन मोकळे करणे आणि नेहमीप्रमाणे जगणे कठीण होऊ शकते. सतत जागरूक राहण्याच्या या अवस्थेला अतिसतर्कता (Hypervigilance) असे म्हटले जाते. ती काही वेळा मानसिक आघातानंतर दिसू शकते.
- अचानक संकट आल्यावर मेंदूची प्रतिक्रिया कशी असते? : अचानक एखादी धक्कादायक घटना घडल्यास शरीर आणि मेंदूची तणावाला प्रतिसाद देणारी यंत्रणा सक्रिय होते. अशा वेळी काही व्यक्ती परिस्थितीचा सामना करतात, काही जण तिथून दूर जाण्याचा प्रयत्न करतात, तर काही जण काही काळ स्तब्ध होतात. या प्रतिक्रिया व्यक्तीनुसार वेगवेगळ्या असू शकतात. त्यामुळे संकटाच्या वेळी एखादी व्यक्ती गोंधळली किंवा स्तब्ध झाली, तर त्याला केवळ कमकुवतपणा समजणे योग्य नाही.
- घराबाहेर पुन्हा पोलिसांची गाडी दिसली तर... : वारंवार होणाऱ्या धमक्या, चौकशी किंवा भयावह अनुभवांमुळे लहान मुलांच्या मनावरही परिणाम होऊ शकतो. घराबाहेरील आवाज, अनोळखी व्यक्तींची उपस्थिती किंवा एखाद्या घटनेची आठवण यांमुळे मुलांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. अशा वेळी मुलांच्या भावना समजून घेणे, त्यांच्याशी शांतपणे संवाद साधणे आणि त्यांना सुरक्षिततेची जाणीव करून देणे महत्त्वाचे असते. भीती किंवा अस्वस्थता दीर्घकाळ कायम राहिल्यास तज्ज्ञांची मदत घ्यावी.
- मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका! : ‘दृश्यम’मधील संवाद केवळ चित्रपटातील उत्कंठा वाढवणारे प्रसंग नाहीत, तर ते मानसिक आरोग्याविषयी विचार करायलाही भाग पाडतात. सततची भीती, झोपेचा अभाव, वारंवार जाणवणारी चिंता, घबराटीचे झटके किंवा भूतकाळातील घटनांमुळे दैनंदिन जीवन विस्कळीत होणे ही लक्षणे दुर्लक्षित करू नयेत.

### मानसिक आरोग्य जपण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी...

- विश्वासू व्यक्तीशी मनातील भावना मोकळेपणाने व्यक्त करा.
- नियमित झोप आणि संतुलित दिनचर्या राखा.
- तणाव कमी करण्यासाठी योग्य विश्रांती आणि शारीरिक हालचालींना वेळ द्या.
- भीती किंवा चिंता दैनंदिन जीवनावर परिणाम करत असल्यास मानसोपचारतज्ज्ञ किंवा समुपदेशकांची मदत घ्या.
- मानसिक त्रास सहन करणाऱ्या व्यक्तीची थट्टा न करता तिला समजून घ्या आणि आवश्यक आधार द्या.
- शेवटी, माणसाला सुरक्षित ठेवणे आणि त्याला मनःशांती मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. शरीर सुरक्षित असले, तरी मन भीतीच्या सावटाखाली असेल तर जीवनाचा आनंद घेणे कठीण होते. ‘प्रत्येक चाहुलीने दचकून जगणे म्हणजे आयुष्य नव्हे!’ हा संवाद मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करतो. कारण खऱ्या अर्थाने निरोगी जीवन जगण्यासाठी शारीरिक सुरक्षिततेसोबत मानसिक शांतताही तितकीच आवश्यक आहे.



## दक्षिण भारतीयांचे दात अधिक पांढरे अन् चमकदार का दिसतात?

### दंतवैद्यांनी सांगितले रहस्य; दातांची चमक टिकवण्यासाठी दिल्या महत्त्वाच्या टिप्स...

**दक्षिण भारतीयांचे दात इतरांच्या तुलनेत अधिक पांढरे, चमकदार आणि निरोगी दिसतात, असे तुम्हालाही कधी जाणवले आहे का? यामागचे नेमके कारण काय, असा प्रश्न अनेकांना पडतो. याबाबत दंतवैद्यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. दक्षिण भारतातील पारंपरिक आहारपद्धती, मुखस्वच्छतेच्या सवयी आणि दातांची निगा राखण्याच्या पद्धती यांचा दातांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. मात्र, केवळ एखाद्या प्रदेशात राहिल्यामुळे किंवा विशिष्ट आनुवंशिक वैशिष्ट्यांमुळे प्रत्येकाचे दात अधिक पांढरे असतीलच, असे नाही. प्रत्येक व्यक्तीच्या दातांचा नैसर्गिक रंग वेगवेगळा असतो.**

दक्षिण भारतीयांचे दात इतर राज्यांतील लोकांच्या दातांपेक्षा अधिक पांढरे असतात, असा समज असला तरी त्याला सर्वांना लागू पडणारा ठोस वैज्ञानिक आधार नाही. दातांचा रंग हा आनुवंशिकता, दातांची अंतर्गत रचना, वय, आहार, जीवनशैली आणि मुखस्वच्छतेच्या सवयी अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो. दातांवर डाग निर्माण करणारे पदार्थ कमी प्रमाणात खाणे, नियमितपणे दात स्वच्छ करणे आणि योग्य निगा राखणे यामुळे दातांचा नैसर्गिक रंग टिकवण्यास मदत होऊ शकते.



### दक्षिण भारतीय आहाराचा दातांच्या आरोग्याला फायदा

दक्षिण भारतातील पारंपरिक आहारात घरगुती ताजे अन्न, इडली, डोसा, डाळी, नारळापासून बनवलेले पदार्थ, कढीपत्ता आणि तंतुमय अन्नपदार्थांचा समावेश असतो. योग्य प्रमाणात आणि संतुलित स्वरूपात घेतलेला असा आहार एकूण आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतो. याउलट, साखरेचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ, गोड पेये आणि वारंवार खाल्ले जाणारे प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ दातांवरील किडीचा धोका वाढवू शकतात. त्यामुळे संतुलित आहार आणि साखरेचे मर्यादित सेवन दातांचे आरोग्य टिकवण्यासाठी महत्त्वाचे आहे. मात्र, इडली, डोसा किंवा विशिष्ट प्रादेशिक पदार्थ खाल्ल्याने दात आपोआप पांढरे होतात, असे समजणे चुकीचे आहे.

### दातांचा नैसर्गिक रंग किंचित पिवळसर असू शकतो

प्रत्येकाचे दात मोत्यासारखे पांढरे असावेत, अशी अपेक्षा असते. मात्र, निरोगी दातांचा रंग नेहमीच पूर्णपणे पांढरा असेल असे नाही. दातांच्या बाहेरील आवरणाला ‘इनॅमल’ (Enamel) म्हणतात. त्याखाली ‘डेंटिन’ (Dentin) हा थर असतो. डेंटिनचा रंग नैसर्गिकरीत्या पिवळसर असल्यामुळे इनॅमलमधून दातांना किंचित पिवळसर छटा दिसू शकते. वयानुसार दातांच्या रंगात बदल होऊ शकतो. चहा- कॉफीचे अतिसेवन, तंबाखू, धूम्रपान आणि दातांवरील डाग यांमुळेही दातांचा रंग बदलू शकतो. त्यामुळे केवळ पांढरेपणावरून दातांचे आरोग्य ठरवता येत नाही.

### रंग-आरोग्य टिकवण्यासाठी काय करावे?

- दात स्वच्छ, चमकदार आणि निरोगी ठेवण्यासाठी दैनंदिन सवयींमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे.
- दिवसातून दोनदा दात घासा : फ्लोराइडयुक्त दंतमंजन वापरून योग्य पद्धतीने दात स्वच्छ करा.
- दातांच्या फटी स्वच्छ ठेवा : दातांमध्ये अडकलेले अन्नकण आणि प्लाक काढण्यासाठी नियमितपणे डेंटल फ्लॉसचा वापर करा.
- पुरेसे पाणी प्या : पाणी प्यायल्याने तोंडातील अन्नाचे काही अवशेष दूर होण्यास मदत होते.
- संतुलित आहार घ्या : कॅल्शियम आणि जीवनसत्त्व ड यांसारख्या पोषक घटकांचा पुरेसा समावेश असलेला आहार घ्या. फळे आणि भाज्यांचाही आहारात समावेश करा.
- साखरेचे सेवन मर्यादित ठेवा : गोड पदार्थ, शीतपेये आणि साखरयुक्त पेये वारंवार घेणे टाळा.
- तंबाखू आणि धूम्रपान टाळा : यामुळे दातांवर डाग पडण्याबरोबरच हिरड्यांचे आजार आणि तोंडाच्या इतर गंभीर समस्यांचा धोका वाढतो.
- दंतवैद्यांकडून नियमित तपासणी करून घ्या : दातांची कीड, हिरड्यांचे आजार आणि इनॅमलला होणारे नुकसान यांचे वेळीच निदान होण्यास मदत होते.

### तेलाने गुळण्या करण्याची पारंपरिक पद्धत किती प्रभावी?

दक्षिण भारतातील काही कुटुंबांमध्ये नारळाच्या किंवा तीळाच्या तेलाने गुळण्या करण्याची पारंपरिक पद्धत प्रचलित आहे. या पद्धतीला ऑइल पुलिंग (Oil Pulling) असे म्हणतात. या पद्धतीमुळे मुखस्वच्छतेला काही प्रमाणात मदत होऊ शकते, असे काही मर्यादित संशोधनातून सूचित होते. मात्र, दातांवरील प्लाक पूर्णपणे काढून टाकण्यासाठी, हिरड्यांचे आजार रोखण्यासाठी किंवा दात पांढरे करण्यासाठी ही पद्धत प्रभावी असल्याचे पुरेसे ठोस वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे तेलाने गुळण्या करणे हा दात घासण्याचा पर्याय नाही. फ्लोराइडयुक्त दंतमंजनाने नियमित दात घासणे आणि दातांच्या फटी स्वच्छ ठेवणे यांना प्राधान्य द्यावे.

### लिंबू, मीठ किंवा बेकिंग सोड्याने दात घासणे टाळा!

दात झटपट पांढरे करण्यासाठी लिंबाचा रस, मीठ किंवा बेकिंग सोडा वापरण्याचे अनेक घरगुती उपाय समाजमाध्यमांवर प्रसारित होतात. मात्र, अशा उपायांचा चुकीचा किंवा वारंवार वापर केल्यास दातांच्या इनॅमलचे नुकसान होऊ शकते. लिंबातील आम्लामुळे दातांचे बाह्य आवरण झिजण्याचा धोका असतो. इनॅमलचे नुकसान झाल्यास दात अधिक संवेदनशील होऊ शकतात. त्यामुळे दात पांढरे करण्यासाठी कोणताही घरगुती प्रयोग करण्यापूर्वी दंतवैद्यांचा सल्ला घ्यावा. दातांवर डाग असल्यास त्यांचे कारण तपासून योग्य उपचार करणे अधिक सुरक्षित ठरते. थोडक्यात सांगायचे तर, दक्षिण भारतीयांचे दात अधिक पांढरे दिसण्यामागे एखादे विशिष्ट प्रादेशिक रहस्य असल्याचे ठोस पुरावे नाहीत. दातांचा नैसर्गिक रंग, योग्य आहार, नियमित मुखस्वच्छता आणि दंतवैद्यांकडून वेळोवेळी तपासणी या बाबी दातांचे आरोग्य टिकवण्यासाठी अधिक महत्त्वाच्या आहेत.



### योगासने करण्याआधी लक्षात ठेवा या महत्त्वाच्या टिप्स!

- योग्य वेळ निवडा : सकाळची वेळ योगासनांसाठी उत्तम मानली जाते. शक्यतो शांत वातावरणात आणि नियमित वेळेला योगाभ्यास करा.
- रिकाम्या पोटी योगासने करा : योगासने करण्यापूर्वी पोट भरलेले नसावे. जेवणानंतर साधारण तीन ते चार तासांचे अंतर ठेवा. हलका नाश्ता केला असल्यास पचनासाठी पुरेसा वेळ द्या.
- आरामदायी कपडे घाला : योगासने करताना शरीराची हालचाल सहज होईल असे सैल आणि आरामदायी कपडे वापरा. सपाट, स्वच्छ आणि न घसरणाऱ्या जागेवर योगाभ्यास करा.
- सुरुवात हलक्या व्यायामाने करा : योगासने करण्यापूर्वी मान, खांदे, हात आणि पाय यांना हलक्या हालचालींद्वारे तयार करा. सुरुवातीलाच कठीण आसने करण्याचा प्रयत्न करू नका.
- श्वासावर लक्ष केंद्रित करा : आसने करताना श्वासोच्छ्वास नैसर्गिक आणि नियंत्रित ठेवा. विनाकारण श्वास रोखून धरू नका.
- शरीरावर ताण देऊ नका : प्रत्येक आसन आपल्या क्षमतेनुसार करा. वेदना, चक्कर किंवा अस्वस्थता जाणवल्यास त्वरित थांबा.

# ‘दसरा’ मेळाव्यात शिवसेना नेत्यांकडून एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री बनवण्याचा संकल्प; भाजपाकडून खोचक प्रतिक्रिया

**मुंबई (प्रतिनिधी)–** दसऱ्याच्या मुहूर्तावर राज्यात जवळपास ५ मेळावे संपन्न झाले. त्यामध्ये मुंबईत दोन्ही शिवसेनेच्या मेळाव्यातून एकमेकांवर टिका टिपण्णी करण्यात आली. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील दसरा मेळाव्यातून शिवसेना नेत्यांनी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपदी विराजमान करण्याचा संकल्प बोलून दाखवला. त्यामध्ये, ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी एकनाथ शिंदे हेच २०२४ मध्ये मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते, त्यांच्याच नेतृत्वात आपण निवडणुकी जिंकल्याचं म्हटलं होतं. आता, भाजपकडून यावर खोचक प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

भाजपा महायुतीने २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात विधानसभेच्या निवडणुका लढल्या होत्या. या निवडणुकीत भाजप महायुती तब्बल २३२ जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळाला. त्यामुळे, मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे हेच विराजमान होतील असा विश्वास शिवसेना आमदार आणि नेत्यांना होता. मात्र, भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्याने भाजपने नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन करण्यात आले. त्यानंतर, सातत्याने शिवसेना नेत्यांकडून एकनाथ शिंदेना मुख्यमंत्री बनवण्याचा संकल्प किंवा वक्तव्य केले जाते. विशेष म्हणजे दसरा मेळाव्यापूर्वी मंत्री प्रताप सरनाईक यांनीही एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपदावर बसवण्याचं वक्तव्य केलं होतं. आता, भाजपाकडून या वक्तव्यावर प्रतिक्रिया आली आहे.

भाजपा प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना नेत्यांच्या वक्तव्यावर भूमिका मांडली. प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांना वाटतं की, मुख्यमंत्री आपला नेता व्हावा. लोकशाहीत आपल्याला मतांची किंमत माहिती आहे, आमदारांचा आकडा जुळत नाही, तोपर्यंत मुख्यमंत्री होऊ शकत नाही, असे म्हणत संख्याबळ हेच मुख्यमंत्री ठरवते असे नवनाथ बन यांनी सांगितले.

# पक्ष प्रवक्तेपदाच्या अनेक ऑफर्स नाकारल्या, विवेकानंद पाटलांचे राजकीय एंट्रीवर भाष्य

**जळगाव (प्रतिनिधी)–** पुण्यातील एमपीएससी आंदोलनातून चर्चेत आलेले विद्यार्थी नेते विवेकानंद पाटील यांना पक्ष प्रवक्तेपदासाठी अनेक ऑफर्स आल्या होत्या; मात्र कुणी लाखो रुपये दिले तरी कोणत्याही पक्षाचा प्रवक्ता होणार नाही, असेही विवेकानंद पाटील यांनी सांगितले. मला राजकारणात जाण्याचे कोणतेही वेध लागलेले नाहीत. विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळत नसतील, तर राजकारणात येऊ द्या, असे विधान उपरोधाने केले होते. मला जे काही करायचे आहे, ते स्वतःच्या हिमतीवर रस्त्यावर उतरूनच करायचे आहे, असे विवेकानंद पाटील यांनी स्पष्ट केले. एमपीएससी आंदोलन सध्या स्थगित केले असून, शासनाने मागण्यांबाबत चुकीची पावले उचलल्यास पुन्हा रस्त्यावर उतरू, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, दिल्लीतील आंदोलनाबाबत बोलताना विवेकानंद पाटील म्हणाले, कोणत्याही लढ्याला पहिल्याच दिवशी यश मिळत नाही. आम्ही ११ दिवस आंदोलन केले, तेव्हा कुठे थोड्याफार प्रमाणात यश मिळाले. अजूनही अध्यक्षांचा राजीनामा झालेला नाही. आम्ही संविधानाच्या मार्गाने लढत आहोत. दिल्लीतील आंदोलकांच्या मागण्या आणि आमच्या मागण्या वेगळ्या आहेत. दोन्ही लढ्यांची तात्त्विक बैठकही वेगळी आहे. सध्या आमचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र आहे, तर त्यांचे देशपातळीवर आहे. तरीही दिल्लीतील आंदोलकांना आमच्या पूर्ण शुभेच्छा आहेत. दरम्यान, आंदोलनातून पुढे

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित –

**महात्मा गांधी बी.एड कॉलेज सिडको, नविन नांदेड**

व

**सावित्रीबाई फुले महिला बी.एड कॉलेज वसरणी, नांदेड**

**बी. एड. प्रथम वर्ष प्रवेश**

**शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७**

**संस्थात्मक प्रवेश फेरी**

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी ऑप्शन फॉर्म भरणे | दिनांक १५/१०/२०२६ ते १७/१०/२०२६ |
| गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे | दिनांक १९/१०/२०२६ |
| विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करणे | दिनांक २१/१०/२०२६ ते २३/१०/२०२६ |

* वरील सर्व प्रक्रिया या पूर्वीच्या प्रवेश फेरीप्रमाणे ऑनलाइन करावी.

* विद्यापीठ निहाय/संवर्गनिहाय/अध्यापन पद्धतीनिहाय गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रिया होईल.

स्वाक्षरीत/–
प्राचार्य
सावित्रीबाई फुले महिला बी.एड
कॉलेज वसरणी, नांदेड

स्वाक्षरीत/–
प्राचार्य
महात्मा गांधी बी.एड कॉलेज
सिडको, नविन नांदेड

# सणासुदीत भेसळखोरांवर ‘एफडीए’ची कारवाई; खाद्यतेल, पनीर, खव्याचा कोट्यवधींचा साठा जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)–** सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अन्नपदार्थ विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाने राज्यव्यापी धडक मोहीम राबवली आहे. १६ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभरात करण्यात आलेल्या या विशेष तपासणी मोहिमेत सुमारे १३.११ कोटी रुपयांचा भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचा आणि असुरक्षित अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. यात ३२,०६१ लिटर खाद्यतेल आणि ३७,१२८ किलो इतर अन्नपदार्थांचा समावेश असून अनेक ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कोकण विभाग (भिवंडी): भिवंडीतील मे. विराज एन्टरप्रायजेस येथे अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली. तपासणीत ‘पोमास ऑइल’ म्हणून विकले जाणारे तेल पूर्णतः शेंगदाणा तेल असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत ११,७७९ लिटर खाद्यतेल आणि २,८५० किलो चहा असा एकूण ११ कोटी २७ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचा साठा जप्त करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर विभाग: या विभागात खाद्यतेल, शेव–फरसाण, खवा, पेढे, कलाकंद, तूप आणि बेकरी उत्पादनांसह एकूण ३३,९४० किलो साठा जप्त करण्यात आला, ज्याची किंमत १८७.५२ लाख रुपये आहे. यात धाराशिव, परभणी, जालना आणि बीड परिसरातील विविध आस्थापनांचा समावेश आहे.

पुणे विभाग: बावधन, कसबा पेठ आणि बिबवेवाडी परिसरात अयोग्य तापमानात साठवणूक व विक्री केल्याप्रकरणी ९,००० किलो पनीर आणि ४४० किलो खवा जप्त करण्यात आला. तसेच पौड रोडवरील M/s Suryam Enterprises मधून ९,८८८ लिटर खाद्यतेल आणि मार्केट यार्डमधून इतर अन्नपदार्थ जप्त करण्यात आले.

नागपूर विभाग: नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात केलेल्या कारवाईत १,०७८.४० लिटर खाद्यतेल आणि ४९ किलो खवा जप्त करण्यात आला. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण १२,००,७७१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## Change In Name

My Old Name is **HUMABEGUM AIJAZAHMED** which now I am changing as New Name **SHAIKH HUMA BEGUM**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

**Sign By: SHAIKH HUMA BEGUM**
**H.NO 9-6-39-9, Imran Colony, Near Iqra Urdu School, Degloor Naka, Nanded, Maharashtra, INDIA Mo.No. 7020164717**

# जाहीर सूचना

**मी, श्री. राम गुलाब हिवंत राहणार खरबी, पो.वडेपुरी ता.लोहा जि. नांदेड याद्वारे जाहीर करतो की, माझ्या आधार कार्डावर जन्मतारीख 01-01-1997 अशी नमूद आहे. परंतु माझ्या शाळेच्या ट्रान्सफर सर्टिफिकेट (टी.सी.) नुसार माझी जन्मतारीख 01-07-1997 अशी आहे.त्यामुळे आधार कार्डावरील जन्मतारीख टी.सी.वरील जन्मतारखेनुसार दुरुस्त करून मिळण्यासाठी ही जाहीर सूचना देण्यात येत आहे. सदर दोन्ही जन्मतारखांपैकी टी.सी.वरील जन्मतारीख ग्राह्य धरण्यात यावी.**

**दिनांक :** 21-10-2026
**ठिकाण :** खरबी,पो.वडेपुरी ता.लोहा जि. नांदेड
**नाव :** श्री. राम गुलाब हिवंत

## जाहिर प्रगटण

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार राधाकिशन कोंडीबा गव्हाणकर वय ६८. रा. जुना कौठा ता.जि.नांदेड मो.नं. ९१५८७८७६७६ यांनी दिनांक २२.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, नांदेड येथे त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करीता मागणी केलेली आहे.

मृत्यु झालेल्याचे नांव निर्मला राधाकिशन गव्हाणकर यांचा राहत्या घरी जुना कौठा, ता.जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ०८.०९.२०२४ या दिवशी मृत्यु झाला असून मृत्यु प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी दि. २२.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, नांदेड येथे अर्ज सादर केलेला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटण प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसिल कार्यालय, नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

**दिनांक : १२.१०.२०२६**
**ठिकाण : नांदेड**

**तहसीलदार, नांदेड**




## Change In Name

My old name was **SUNITHA ANJAIAH KANGTI**, which I am now changing to my New Name **SUNITA UDAY KHANDERAY**. Henceforth. All Correspondence Will Be Done As Per My New Name **SUNITA UDAY KHANDERAY**. Please Consider The Same.
**Address: LINE NO 504, OFFICERS QUARTER, POLICE HEAD QUARTER, PARBHANI - 431401 Mobile No: 8378803004**

## Change In Name

Change my mother name from **GAZIA BEGUM SYED AHMED ALI** to **GAZIA BEGUM.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address:
R/o H.No. 1-1-555, Rakasipet,
Bodhan Dist. Nizamabad pin. 503185

## जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटना द्वारे सूचित करण्यात येते की मौजे लोंढेसांगवी ता लोहा जिल्हा नांदेड येथील गट क्रमांक १९ मधील १ हेक्टर २१ आर जमिनी बाबत दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्थर लोहा येथे आर सी एस नंबर १२४ / २०२६ वादी लालबा लोंढे विरुद्ध अनुसयाबाई लोंढे इतर दावा दाखल तारीख ५,१०,२०२६ व पुढील तारीख २७,११,२०२६ असून मौजे लोंढेसांगवी व इतर परिसरातील जमीन वादग्रस्त गट १९ मधील २१ आर जमीन कोणी खेदी गहाण किंवा इतर कर्ज देऊ नये अन्यथा आपणास येणारा परिणामास जबाबदार रहाल ही नम्र विनंती

**जाहीर प्रगटन देणार**
**लालबा व्यंकटी लोंढे**
**रा लोंढेसांगवी ता लोहा जिल्हा नांदेड**
**मार्फत**
**ॲड डी पी बाबर लोहा**
**मो नंबर ९३२६०७२७७८**
**दिनांक १९,१० २०२६**

### जाहीर प्रगटन

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४२/ २०२६**

**पुढील तारीख – १८.११.२०२६**

अर्जदार :१) निळकंठ पि. गजानन कहाळेकर, वय ७६ वर्षे, धंदा सेवानिवृत्त मुख्याध्यापक,
रा. कहाळा बु., ता. नायगांव, जि. नांदेड
२) धनंजय पिता निळकंठराव कहाळेकर, वय ५३ वर्षे, धंदा नौकरी,
रा. कहाळा बु., ता. नायगांव, जि. नांदेड, सध्या रा. फरांदेनगर (वाडी बु.), नांदेड ता. जि. नांदेड
३) माधुरी भ्र. चंद्रशेखर कहाळेकर, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
४) मनाली भ्र. महेंद्र कुलकर्णी, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. लातुर, ता. लातुर, जि. लातुर

**विरुध्द**

गैरअर्जदारः शाखा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा नायगाव ता. नायगाव जि नांदेड

**विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ही **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे पती आहेत. अर्जदार क्रमांक ०२ ते ०४ हे **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे अपत्ये आहेत. **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचा मृत्यु दिनांक **२५/०८/२०२३** रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे गैरअर्जदार यांच्या शाखेत खालील तक्ता मध्ये दर्शविलेले खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा आहे.

| अनु. क्र. | बँक नाव व शाखा | खाते क्र. | मुदत ठेव रक्कम |
|---|---|---|---|
| ०१) | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा नायगाव ता. नायगाव जि नांदेड | ६२४५३३४२२११ | ५,५८,३६६/- |

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन/नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **मयत विजया निळकंठ कहाळेकर** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली — दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.९१३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ४८१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, चंदमुनी रमेश काशिदे रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४८१, वार्ड क्र. १५ विशाल भाऊराव लोखंडे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५८४/२६ दि. १०/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – भिसे यांचे घर,
पश्चिमेस – भगवानराव येरेकर यांचे घर, दक्षिणेस – खुली जागा,
उत्तरेस – रोड.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.९१२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ५०८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, चांदराव रामजी कलोटे रा. टेंभी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५०८, वार्ड क्र. १५ रंगराव मारोती कलोटे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १२१०/२६ दि. १३/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. १८,
पश्चिमेस – अंतर्गत रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट क्र. २२,
उत्तरेस – प्लॉट क्र. २४.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.९११

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ४१५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मारोती रामराव काळे रा. एकंबा ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४१५, वार्ड क्र. १५ रूक्मिणी प्रकाशराव नरवाडे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०८५/२६ दि. ०४/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ५२,
पश्चिमेस – प्लॉट नं. ४५,
दक्षिणेस – कॉलनी रस्ता,
उत्तरेस – प्लॉट नं. ४८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.९१०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ७९३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रिझवाना हय्युम शेख रा. सांगवी ता. किनवट यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७९३, वार्ड क्र. १५ अब्दुल गुफरान अब्दुल हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ११९७/२६ दि. ०८/१०/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. ६३ व ६४,
पश्चिमेस – प्लॉट क्र. ६८,
दक्षिणेस – अंतर्गत रस्ता,
उत्तरेस – प्लॉट क्र. ६६.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, होटाळा
तालुका नायगाव जिल्हा नांदेड

**जाहीर प्रगटन**

जाक्र /श्रीदशिप्रम/ होटाळा /२०२६–२७/४९ दि. २१.१०.२०२६

श्री किशोर रमेशराव पवार राहणार (होटाळा पोस्ट नरसी तालुका नायगाव जिल्हा नांदेड ह.मु. मारुती मंदिर बाजूस सोनाई नगर च्या पाठी मागे नायगाव बा)

श्री किशोर रमेश पवार सहशिक्षक श्रीदत्त जुनिअर कॉलेज नायगाव बा. ता. नायगाव जिल्हा नांदेड यांना सुचित करण्यात येते की श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ होटाळा द्वारा संचलित श्री दत्त जुनिअर कॉलेज नायगाव या कॉलेज वर सहशिक्षक श्री किशोर रमेशराव पवार आपण १५ जून २०२६ पासून आज तागायत लेखी किंवा तोंडी सूचना परवानगी न घेता सतत गैरहजर आहात.

आपणास दिनांक २०/६/२०२६ पासून प्राचार्य व अध्यक्ष यांनी आजपर्यंत आपणास स्पीड पोस्ट द्वारे (ठझऊ) पत्र व्यवहार पाठवून कॉलेजच्या नोटीस फलकावर चिटकवून आणि आपल्या मूळगावी व राहत्या घरावर नोटीस चिटकून सुद्धा आपण कॉलेजवर येत नाहीत. तसेच स्पीड पोस्ट (ठझऊ)) चे पत्र घेण्यास नकार देत आहात. व कर्तव्यावर गैरहजर राहत आहात. आपणाकडून वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा कोणताही प्रतिसाद येत नसल्यामुळे आपणावर नियम ३६ एमइपीएस नियम १९८१ प्रमाणे खालील प्रमाणे दोषारोप ठेवून द्वि सदस्सीय चौकशी समिती गठित करून चौकशी चालू आहे.

आरोप क्रमांक १.

बेशिस्त व गैरवर्तवणूक,आरोप क्रमांक २. कर्तव्यात हेतू परस्पर हयगय करणे.

आरोप क्रमांक ३. अकार्यक्षमता

आरोप क्रमांक ४. बेकायदेशीरपणे संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणे. आरोप क्रमांक ५. वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे.. आरोप क्रमांक ६.

संस्थेअंतर्गत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दहशत निर्माण करणे. आरोप क्रमांक ७. जातीय भेदभाव करून तिरस्काराची वागणूक देणे समतेच्या च्या सिद्धांताची पायमल्ली करणे व जीवे मारण्याची धमकी देणे.

यामुळे कनिष्ठ महाविद्यालयात जातीय सलोखा संपुष्टात आला असून त्यांचे परिणाम शैक्षणिक वातावरण दूषित झालेले आहे. तसेच आपणाकडे जीवशास्त्र महत्त्वाचा विषय आहे आपण गैरहजर असल्यामुळे अध्ययन, अध्यापन, प्रक्रियेवर फार मोठा विपरीत परिणाम होत आहे. तसेच विध्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे. आपल्या कडून प्रतिनिधी आपल्यावर ठेवण्यात आलेलेल्या आरोपासंदर्भात चौकशी समिती समोर आपली बाजू मांडण्याचे कळवले होते तरी सदरील नोटीस ठझऊ पाठवलेले घेण्यास नकार दिल्या मुळे RPD स्पीड पोस्ट परत आले आहेत. असे बैठकी मध्ये चर्चा करून आपले काही म्हणणे मांडायचे असल्यास येणाऱ्या बैठकी मध्ये आपण प्रतिनिधीसह येऊन मांडावे असे ठरले.

या पूर्वी द्वि सदसीय चौकशी समितीची बैठक खालील प्रमाणे घेण्यात आली.

पहिली बैठक : दि. ३०/०९/२०२६ रोजी
दुसरी बैठक : दि. ०९/१०/२०२६ रोजी
तिसरी बैठक : दि.१९/१०/२०२६ रोजी संपन्न झाली.

यानंतर आपणास कळविण्यात येते की पुढील बैठक क्रमांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शुक्रवार या दिवशी सकाळी ठीक ११:३० वाजता श्री दत्त जुनिअर कॉलेज नायगाव या कॉलेजच्या कार्यालयात ठेवण्यात आली आहे. या मुळे आपणास बाजू मांडावी म्हणून चौकशी समितीने आणखी एक संधी देण्याचे ठरवलेले असल्या मुळे पुढील बैठकीत हजर रहावे. दि. ३० ऑक्टोबर २०२६ वेळ: ११:३० च् (सकाळी)

स्थळ : श्री दत्त ज्यु. कॉलेज नायगाव ता. नायगाव जि. नांदेड.

निमंत्रक : चौकशी समिती
श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ होटाळा.
ता. नायगाव जि. नांदेड.

## जाहीर सूचना/नोटीस

सर्व जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, शिवाजीनगर, नांदेड येथील खालील वर्णनाची मालमत्ता माझ्या, माझे पक्षकार **प्रशांत ओमप्रकाश गड्डम रा. शिवाजीनगर, नांदेड** यांच्या कायदेशीर मालकी व ताब्यातील आहे.

**मालमतेचे वर्णन :**
१) मालमत्ता क्रमांक 4189, एकूण क्षेत्रफळ 20659 चौ. फूट
२) मालमत्ता क्रमांक 4184, एकूण क्षेत्रफळ 2698 चौ. फूट

दोन्ही मालमत्ता शिवाजीनगर, नांदेड येथे स्थित. सदर मालमत्ता मूळतः माझे पक्षकाराचे आजोबा कै. दत्तात्रय अप्पाराव गड्डम यांच्या मालकीची होती. त्यांनी दिनांक ०१/१०/१९९० रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र (दस्त क्रमांक २९८) करून सदर मालमत्ता मृत्युपत्राद्वारे माझ्या नावे दिलेली आहे. त्यांच्या मृत्यूनंतर सदर नोंदणीकृत मृत्युपत्राच्या आधारे मी सदर मालमतेचा एकमेव कायदेशीर मालक व कब्जेदार आहे.

कै. दत्तात्रय अप्पाराव गड्डम यांचे चार मुले व दोन मुली, म्हणजेच, १) गणेश दत्तात्रय गड्डम २) प्रकाश दत्तात्रय गड्डम ३ नागनाथ दत्तात्रय गड्डम,४) विजय दत्तात्रय गड्डम वं मुली ५)सुशीलाबाई दिगंबर अक्काम्वर६) सुनिता गोविंद कोंडा यांनी संगनमताने स्वतःला कै. दत्तात्रय गड्डम यांचे वारस दर्शवून भूमि अभिलेख कार्यालय (T.I.L.R.), नांदेड येथे अर्ज करून सदर मालमत्तेच्या मालमत्ता पत्रकावर (पी.आर.कार्ड) आपली नावे नोंदवून घेतली आहेत. त्या संबंधी अपील मा. Dy.Director land Record औरंगाबाद येथे चालू आहे. तसेच माझे वडिलाचे नाव ओमप्रकाश असे असताना मुधाम त्यांचे नावात बदल करून ओमप्रकाश न दाखवता फक्त प्रकाश असी नोंद केली. त्यांनी मला पक्षकार न करता मा. दिवाणी न्यायालय, नांदेड येथे वाटपाचा दावा क्रमांक 427/2021 दाखल केलेला असून त्यात माझी मालकीची मालमत्ता दावा क्रमांक 427/2021 मध्ये दाखवली वं कोर्टाची दिशा भूल केली. आता सध्या त्याचे अपील न.131/2018 न्यायप्रविष्ट (प्रलंबित) आहे. सदर दाव्यात मा.न्यायालयाने आदेशान्वये, सदर मालमत्ता मृत्युपत्राद्वारे माझे पक्षकार यांना मिळालेली असल्याने, ती दाव्यातून वगळलेली आहे. सदरील माल्मतेचे नगर पालिका मध्ये करआकारणी वं वीज मिटर चा भरणा माझे पक्षकार आजपर्यंत भरत आहेत.

असे असताना वरील सहा व्यक्ती सर्व जनतेची दिशाभूल करून माझ्या पक्ष काराच्या वरील मालमते बाबत ते मालक आहेत असे भासवून जनतेची दिशाभूल करून खोटे आखीव पत्रिकेवरील खोडसाळ पणे त्यांचे नावाचा उलेख माझ्या पक्षकाराचे माघारी करून वं तसेच त्या बाबत अपील चालू असतानाही वरील मालमते बाबत जनतेची दिशा भूल करून विक्री करू पहात आहेत. केवळ पी.आर. कार्डवरील नोंदीच्या आधारे सदर मालमत्ता विक्री, गहाण, बक्षीसपत्र, भाडेपट्टा, विसार/साठेखत, कुलमुखत्यारपत्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करून त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे माझ्या पक्षकाराचे निदर्शनास आले आहे. दिवाणी दावा क्रमांक 427/2021, रेगुलर अपील न.131/2018, रेगुलर अपील न.132/2018 हे मा. नांदेड जिल्हा न्यालायात प्रलंबित आहेत. वरील सहाही जणांना माझे पक्षकाराचे आजोबा कै. दत्तात्रय अप्पाराव गड्डम हे त्यांच्या मृत्युच्या वेळी वरील मालमत्ता क्रमांक 4189, एकूण क्षेत्रफळ 20659 चौ. फूट व मालमत्ता क्रमांक 4184, एकूण क्षेत्रफळ 2698 चौ. फूट चे मालक नव्हते वं वरील मालमता ही माझ्या पक्षकाराचे हक्कात अगोदरच मृत्युपत्रा आधारे करून दिलेली होती. वं माझे पक्षकार तेव्हा पासूनच कायदेशीर मालक झालेले आहेत. या सर्व बाबीची वरील सर्वांना माहिती असूनही केवळ माझ्या पक्षकाराची वरील मालमत्ता गिळंकृत करन्याच्या उद्येशाने ते वरील बेकायदेशीर कारनामे करीत आहेत.

**तरी सर्व जनतेस, खरेदीदारांस, बँका व वित्तीय संस्थांस याद्वारे सावध करण्यात येते की,** वरील सहा व्यक्तींचा सदर मालमतेशी कोणताही कायदेशीर संबंध नाही व त्यांना सदर मालमत्ता हस्तांतरित करण्याचा कोणताही अधिकार नाही. कोणीही त्यांच्याशी सदर मालमत्तेबाबत खरेदी-विक्री, गहाण, साठेखत अथवा अन्य कोणताही व्यवहार करू नये. तसा व्यवहार कोणी केल्यास तो पूर्णतः बेकायदेशीर, शून्यवत व माझ्या पक्षकारावर कायदेशीर बंधनकारक राहणार नाही, आणि त्यातून होणाऱ्या आर्थिक व कायदेशीर नुकसानीस संबंधित व्यवहार करणारी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील. अशा व्यवहाराविरुद्ध माझे पक्षकार योग्य ती दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करतील याची गंभीरपणे नोंद घ्यावी.

दि.20.09.2026

मार्फत
**ॲड. बी.एम.कुंभेकर**
काबरानगर, नांदेड.
मो.क्र.९४२२१७१९३४

नोटीस देणार
**प्रशांत ओमप्रकाश गड्डम**
रा. गड्डम मार्केट, शिवाजीनगर,
नांदेडः मो.क्र.९५४५२८७७७८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# दुष्काळात पशुधनाच्या चारा उपलब्धतेसाठी कृषी अवशेषांचा ५० टक्के साठा राखून ठेवा -जिल्हाधिकारी कर्डीले

## कृष्णूर औद्योगिक क्षेत्रातील बायोकोल व प्लायवूड उद्योगांना राहुल कर्डिले यांची भेट

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध व्हावा, यासाठी कृषी अवशेषांचा योग्य वापर करून चारा निर्मितीला प्राधान्य द्यावे. उपलब्ध कृषी अवशेषांच्या साठ्यापैकी ५० टक्के साठा जनावरांसाठी चारा प्रक्रिया करण्याकरिता उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कृष्णूर औद्योगिक क्षेत्रातील अभिजित बायोकोल इंडस्ट्रीज आणि गोदावरी प्लायवूड पार्टिकल इंडस्ट्री या उद्योगांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी उद्योजकांशी चर्चा करून कृषी अवशेषांचा वापर, उपलब्ध साठा आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने उपाययोजना हाती घेतल्या आहेत. याअंतर्गत पिकांचे अवशेष, सोयाबीन कुटार आणि उसाचा चोथा पशुखाद्यासाठी उपलब्ध व्हावा, यासाठी वाहतूक व विक्रीसंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी औद्योगिक प्रकल्पांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली.

बायोकोल निर्मिती तसेच अन्य औद्योगिक प्रक्रियांसाठी वापरल्या जाणाऱ्या कृषी अवशेषांपैकी उपलब्ध साठ्याचा काही भाग पशुधनासाठी चारा निर्मितीकरिता राखून ठेवण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या काळात पशुधनाला चारा उपलब्ध होणे आवश्यक असल्याने संबंधित उद्योगांनी प्रशासनाच्या उपाययोजनांना सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

सोयाबीन कुटार आणि उसाच्या चोथ्यावर योग्य पद्धतीने युरिया-मोलॅसिस प्रक्रिया केल्यास त्यांचे पोषणमूल्य वाढविण्यास मदत होते. त्यामुळे चारा टंचाईच्या काळात अशा प्रक्रियायुक्त कृषी अवशेषांचा पर्यायी पशुखाद्य म्हणून उपयोग करता येतो. उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करून चारा निर्मिती वाढविणे आणि पशुधनाचे पोषण सुनिश्चित करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले.

जिल्ह्यातील सर्व बायोकोल उद्योगचालक आणि शेतकऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या कामात जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कृषी अवशेषांचा योग्य वापर करून चारा टंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; गावठी पिस्टलसह तरुणाला अटक, साथीदार फरार



**नांदेड (प्रतिनिधी)**– विनापरवाना अवैध गावठी पिस्टल आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्याविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका युवकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस जप्त केले आहे.

दि. २० ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांचे पथक अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी नांदेड शहरात गस्त घालत असताना ईदगाह मैदान परिसरात एक युवक संशयास्पदरित्या पिस्टल बाळगून फिरत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खात्री करून पथकाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून संशयितास ताब्यात घेतले.

त्याचे नाव अन्वर खान अमजद खान (वय २१, रा. खुदबेनगर, नांदेड) असे निष्पन्न झाले. अंगझडतीत त्याच्या ताब्यातून सिल्वर रंगाचे एक गावठी पिस्टल व मॅगझिनमध्ये एक जिवंत काडतूस मिळून आले. जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ३६ हजार रुपये आहे.

सदर पिस्टल बाळगण्यासाठी परवाना आहे का? याबाबत विचारणा केली असता कोणताही वैध परवाना नसल्याचे समोर आले. विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने सांगितले की, सदर पिस्टल आपला मित्र आमेर अहमद खान उर्फ आमेर जिहादी उर्फ महेफुज खान (रा. इक्बाल नगर, नांदेड) याच्याकडून घेतले आहे. पोलिसांनी पंचांसमक्ष अग्निशस्त्र जप्त केले.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गु.र.नं. १३६२/२०२६, कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या आदेशाने, पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि साईनाथ पुयड, पोलीस अंमलदार संतोष बेल्लुरोड, इम्रान शेख, बालाजी कदम, प्रमोद जोंधळे, संदीप घोगरे, रविकुमार हराळे, अमोल घेवारे यांनी पार पाडली.

जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या व त्यांचा वापर करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



**नांदेड** – विजयादशमीनिमित्त हुजूर साहिब सचखंड गुरूद्वारा परिसरात शीख बांधवांच्या वतीने प्रतिकात्मक हल्लाबोल मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देशभरातून आलेले शीख बांधव दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस)**

# सिडको-हडकोतील नागरिकांच्या विश्वासाला पात्र, विकासासाठी कटिबद्ध

## खा. अशोकराव चव्हाण यांचे रावण दहन सोहळा प्रसंगी प्रतिपादन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– महानगर पालिका निवडणुकीमध्ये सिडको-हडको, वसरणी, कौठा परिसरातील नागरिकांनी दोन्ही प्रभागातील नऊ पैकी नऊ जागेवर भाजपा पक्षाचे उमेदवार निवडून देऊन महापालिकेत बहुमत सिद्ध केल्याबद्दल परिसरातील नागरिकांच्या विश्वासाला पात्र झालो असल्याने परिसरातील विकासासाठी कटिबद्ध आहे, अशी ग्वाही माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली. ते सिडको-हडको येथील रावण दहन कार्यक्रमात बोलत होते.

गेल्या १६ वर्षांपासून विजया दशमी-दसरानिमित्ताने हडको परिसरातील वाघाळा पाटी नजीक रावण दहनाचा कार्यक्रम होतो. यंदा २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ८ वाजता माजी मुख्यमंत्री तथा भाजपा खासदार अशोकराव चव्हाण, मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या गजरात भावगीत भक्ती गीताचा सुमधुर आवाजात रावण दहन करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मनपाचे प्रभाग क्रमांक २० चे भाजपाचे वैजनाथ देशमुख यांच्या वतीने हडको वाघाळा परिसरात हिंगोली येथील कलाकारांच्या सहाय्याने ५१ फुट दहा तोंडी रावण तयार करण्यात आले. विजयादशमी निमित्ताने सायंकाळी ८ वाजता खा. अशोकराव चव्हाण, आ. अमर राजूरकर, डॉ. सचिन पाटील उमरेकर, महापौर सौ. कविता मुळे, चैतन्यबापू देशमुख, प्रवीण साले, माजी महापौर विजय येवनकर, भाजपा युवती प्रमुख सांभवी साले, शीतल खांडील, मनपाचे माजी विरोधी पक्षनेते जीवन पाटील घोगरे, ॲड. दिलीप ठाकूर, जनार्दन ठाकूर, नगरसेवक चंद्रशेखर पवळे, संदीप सोनकांबळे,भाजपा सिडको मंडळ सचिन रावका, ग्रामीण अध्यक्ष विश्वंभर शिंदे, डॉ.नरेश रायेवार, डॉ.करुणा जमदाडे, ॲड दिलीप ठाकूर, जनार्धन गुपिले, सौ. विजयाताई गोडघासे, भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, सौ. सुर्वणा सतीश बसवदे, उपसभापती सौ.निरंजना लांडगे, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश बसवदे, राजू लांडगे, माजी नगरसेवक संजय इंगेवाड यांच्यासह भाजपा पक्षाचे विविध आघाडी पदाधिकारी व मान्यवरांची उपस्थिती होती.



# अनिल गंगाखेडकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– अशोकनगर गृहनिर्माण संस्थेचे सदस्य अनिल गंगाखेडकर यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी अल्पशा आजाराने दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६.१६ मि. संभाजीनगर येथे निधन झाले आहे.

त्यांची अंत्ययात्रा अशोकनगर येथील त्यांच्या निवासस्थानावरून बुधवारी सायंकाळी निघाली. त्यांच्या पार्थिवावर गोवर्धनघाट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई, नात, मुलगा, सून असा परिवार आहे.

# एशियन पॅरा गेम्स् स्पर्धेत भाग्यश्री जाधवने पटकावले रौप्य पदक

## महाराष्ट्राच्या लेकीने नवरात्रौत्सव काळात दुसऱ्यांदा मारली बाजी

**नांदेड (प्रतिनिधी)**–जपानमध्ये आयोजित 'एशियन पॅरा गेम्स' स्पर्धेत नांदेडची भूमिपुत्र तथा पुण्याच्या मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी भाग्यश्री जाधव यांनी गोळाफेक प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावत भारतासाठी रौप्य पदक मिळवले आहे. नवरात्रौत्सवाच्या काळात महाराष्ट्राच्या या लेकीने सलग दुसऱ्यांदा आंतरराष्ट्रीय स्तरावर देदीप्यमान यश मिळवल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.



नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवासी असलेल्या आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा जगतात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. सन २०१७ पासून त्यांच्या क्रीडा प्रवासाला सुरुवात झाली. अवघ्या ९ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये २५ सुवर्ण, ४ रौप्य आणि ७ कांस्य अशा एकूण ३६ पदकांची कमाई केली आहे. आतापर्यंत त्यांनी १० देशांमध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय व जागतिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

सन २०२१ ची 'टोकियो' आणि २०२४ ची 'पॅरिस' पॅरालिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचा बहुमान त्यांना मिळाला आहे. विशेष म्हणजे, पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचे 'ध्वजवाहक' होण्याचा ऐतिहासिक मानही भाग्यश्री जाधव यांना मिळाला होता. त्यांच्या या देदीप्यमान क्रीडा सेवेची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांना 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारा'ने सन्मानित केले असून, 'मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (वर्ग-१)' या पदावर त्यांची नियुक्ती केली आहे.

जपानमधील आयची-नागोया येथे १८ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडलेल्या एशियन पॅरा गेम्समधील गोळाफेक स्पर्धेत त्यांनी ८.१९ मीटर अंतरावर गोळाफ ेक करत रौप्य पदकावर आपले नाव कोरले. ही त्यांची क्रीडा प्रवासातील वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली आहे. दर चार वर्षांनी होणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धे त महाराष्ट्रातून सहभागी होणाऱ्या त्या एकमेव महिला खेळाडू होत्या आणि त्यांनी या संधीचे सोने करत देशवासीयांची मान अभिमानाने उंचावली.



**नांदेड** – शहरात विजयादशमीनिमित्त हनुमानपेठ वजिराबाद येथे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथसंचलनावर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी आ. अमरनाथ राजूरकर, महापौर सौ. कविता मुळे, प्रकाश मुथा, अमितसिंह तेहरा, सुमित मुथा आदी दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस)**

# आ. रोहित पवार यांनी घेतली क्षीरसागर कुटुंबातील मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेडमधील बोरगाव येथील शेतकरी शंकर क्षीरसागर यांच्या आत्महत्येच्या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी बोरगाव येथे जाऊन क्षीरसागर कुटुंबियांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबातील मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याची ग्वाही दिली.




शंकर क्षीरसागर यांच्या एका मुलीचे पुण्यात वैद्यकीय शिक्षण सुरू असून, दुसऱ्या मुलीचे अधिकारी होण्याचे स्वप्न आहे. या दोन्ही मुलींच्या शिक्षणासाठी मदत करण्याची तयारी रोहित पवार यांनी दर्शवली. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलीच्या पुढील तीन वर्षांच्या शिक्षणासह राहण्या-खाण्याचा संपूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. तसेच दुसऱ्या मुलीचे अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष भगवानराव आलेगावकर, धनंजय सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

दरम्यान दुष्काळामुळं पिकांचं झालेलं नुकसान, वीजपुरवठा खंडित झाल्यानं पिकांना पाणी देता न येणं, कर्जमाफीचा प्रश्न आणि मुलीच्या शिक्षणासाठी अतिरिक्त शुल्काची मागणी अशा अनेक अडचणींमुळं शेतकरी तणावाखाली असल्याचं रोहित पवार यांनी सांगितलं.

# किशन पोले यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गाडीपुरा भागातील रहिवाशी किशन रंगनाथ पोले यांचे हृदयविकाराने निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ४८ वर्षे होते.



गाडीपुरा येथील त्यांच्या राहत्या घरी रात्री ८ च्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले असून, दि. २० ऑक्टोबर रोजी रामघाट स्मशानभूमी गाडीपुरा नांदेड येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई सरस्वतीबाई, पत्नी शीला, मुलगा विजय, मुलगी तेजस्वीनी, दिव्या असा परिवार आहे. शिवसेना ओबीसी राज्य संपर्क प्रमुख अनिल पाटील धमने यांचे ते मेव्हणे होत.

# आ. चिखलीकर यांच्या हस्ते कौठा येथील बालाजी मंदिरात रावण दहन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट बालाजी मंदिर विकास नगर जुना कौठा नांदेड येथे विजयादशमीच्या निमित्ताने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते ३१ फुटी दहा तोंडी रावणाचे दहन २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी विधीवत पूजन करून करण्यात आले. यावेळी मान्यवर पदाधिकारी व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बालाजी मंदिर कौठा येथे १६ व्या ब्रम्होत्सव निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, तर २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता ३१ फुटी रावण दहन सोहळा आयोजित केला होता. प्रारंभी आ. चिखलीकर यांच्या हस्ते भगवान बालाजी मंदिरात महाआरती करण्यात आली.





यावेळी ट्रस्टच्या वतीने माजी आमदार मोहनराव हंबर्डे, दिलीप कंदकुर्ते, माजी नगरसेवक राजू गोरे, नगरसेवक प्रतिनिधी विनोद काकडे यांचा फेटा, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विकास नगर गृहनिर्माण संस्था अध्यक्ष उत्तम वरपडे, सचिव गंगाधर बडवणे, श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार पवार, कार्याध्यक्ष उध्दव बसवदे, सचिव बाबाराव इबितवार कोषाध्यक्ष उत्तमराव भाले यांच्यासह पदाधिकारी साईनाथ फत्तेवार, हनुमान शकरवार, धनंजय वट्टमवार, लक्ष्मीकांत मुक्कावार, बालाजी तमकुटे, गजेंद्र पंडित, पुरुषोत्तम सोनी, साईनाथ वरपडे, विनोद सुत्रावे, भगवानराव पुजारी, विनोद काकडे, अशोकराव दिलेराव व भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. १६ व्या ब्रम्होत्सव निमित्ताने बालाजी मंदिर परिसरात आकर्षक सजावट व रोषणाई करण्यात आली होती. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त लावला होता.

# सौ. लक्ष्मीबाई कल्याणकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील कहाळा (खुर्द) येथील वयोवृद्ध ज्येष्ठ महिला सौ. लक्ष्मीबाई नागोराव पाटील कल्याणकर यांचे वृद्धापकाळाने बुधवार, दि. २१ रोजी सायंकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. २२ रोजी दुपारी २ वाजता कहाळा (खुर्द) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, ४ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, असा परिवार असून, त्या श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल कापसी (गुंफा) येथील सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक सुरेश कल्याणकर यांच्या मातोश्री होत.



**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com